# अनुक्रमणिका


| नियम क्रमांक | विनियम | पान क्र. |
|---|---|---|
| १ | नाव व उद्देश | १ |
| २ | अर्थविवरण | १ |
| ३ | नियंत्रण | ४ |
| ४ | सदस्यत्व | ५ |
| ५ | विश्वस्त | ८ |
| ६ | रोखे / रोख रकमेचे हस्तांतर | ११ |
| ७ | निधीचे व्यवस्थापन | ११ |
| ८ | नामनिर्देशन | ११ |
| ९ | वर्गणीदाराचे खाते | १३ |
| १० | वर्गणीदाराचा स्वतंत्र हिशेब ठेवणे | १३ |
| ११ व १२ | शर्ती व वर्गणीचे दर व ऐच्छिक वर्गणी | १४ |
| १३ | स्वीयेतर सेवेत बदली | १४ |
| १४ | वर्गणी वसूल करणे | १५ |
| १५ | मंडळाचे अंशदान | १५ |
| १६ | व्याज | १६ |
| १७ | निधीतून अगाऊ रक्कम देणे | १७ ते २४ |
| १८ | अगाऊ रकमेचे हप्ते,वसूली व त्यावरील व्याज | २५ |
| १९ ते २७ | विमापत्रांची प्रदाने | २६ ते ३२ |


कृ.मा. पहा

# अनुक्रमणिका


| नियम क्रमांक | विनियम | पान क्र. |
|---|---|---|
| २८ | अगाऊ रक्कम त्याच प्रयोजनासाछी वापर न केल्यास | ३२ |
| २८ (क) | अगाऊ रक्कम मंजूर करणारे सक्षम अधिकारी | ३३ |
| २९ ते ३४ | संचीत रकमा कोणत्या प्रसंगी देय होतील | ३१ ते ३८ |
| ३५ | कार्य पद्धती | ३९ |
| ३६ | खाते क्रमांक | ३९ |
| ३७ | टाच आणण्याविरुद्ध संरक्षण | ३९ |
| ३८ | रोख्यांची विक्री किंवा तारण | ३९ |
| ३९ | बचत बँकेचे खाते | ४० |
| ४० | बचत बँक व दुय्यम सर्वसाधारण खतावणी खाते | ४० |
| ४१ | विनियमाचे फेरफार किंवा फेरबदल | ४० |
| ४२ | विश्वस्त केंव्हा जबाबदार असतील | ४१ |
| ४३,४४ | विवाद | ४१ |
| ४५ | निधी बाबतचा खर्च | ४१ |
| ४६,४७,४८ | निधी बंद करणे | ४२ |
| ४९ | नियम व विनियम करण्याचे अधिकार | ४२ |

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
# अंशदायी भविष्य निर्वाह निधी विनिमय (१९६०)

**नियम - १ : नाव व उद्देश**

(एक) या विनियमांना "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्य ननिर्वाह निधी विनियम, ११(१९६०)" असे म्हणावे.

(दोन) मूळ विनियम दिनांक १ जानेवारी, १९६१ पासून अंमलात आले; परंतु अंशदानाच्या दरात ६¼ टक्केऐवजी ८⅓ टक्के हा बदल करण्यासंबंधातील विनियम दिनांक १ जून १९६० आणि X(८⅓ टक्केऐवजी १० टक्के दि. १ जून १९८९) XX(आणि १० टक्के ऐवजी १२ टक्के दि. २२ सप्टेंबर १९९८) पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे.

तथापि, सुधारित विनियम दिनांक ६ ऑक्टोबर, १९६७ पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे (पहा : महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग पत्र क्र. इपीएफ / ११६६ / ११८५७१- एलएबी (एक), दिनांक ६ ऑक्टोबर, १९६८.)

मात्र, मुंबई राज्य विद्युत मंडळातील कर्मचाऱ्यांची मागील अखंड सेवा, जणू काही ती सेवा या मंडळात झालेली सेवा आहे असे मानून, विनियम क्र. ४ व क्र. ३२ यांच्या प्रयोजनास्तव हिशेबात घेण्यात येईल.

आणखी असे की, मुंबई राज्य विद्युत मंडळाच्या अंशदायीं भविष्यनिर्वाह निधी विनियमान्वये कर्मचाऱ्यांना मिळत नसलेले कोमतेही लाभ या विनियमान्वये आता मिळू लागले असतील तर ते त्यांना भूतलक्षी प्रभावाने न मिळता दिनांक १ जानेवारी, १९६१ पासून किंवा त्यानंतर वेळोवेळी असे लाभ देण्यात येतील अशा नंतरच्या तारखेपासून मिळतील.

**नियम - २ : अर्थविवरण**

(१) या विनियमांमध्ये, विषय किंवा संदर्भ यामध्ये कोणतीही गोष्ट प्रतिकुलेष्ट नसेल तर,—

**(एक) "मंडळ"** म्हणजे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व त्याच्या शाखा मग त्या एकाच ठिकाणी किंवा निरनिराळ्या ठिकाणी असोत;

**(दोन) "अंशदान"** म्हमजे, आपल्या वित्तलब्धीतून कोणत्याही कर्मचाऱ्याने किंवा त्याच्या वतीने त्याच्या वैयक्तिक खात्यात किंवा मंडळाने स्वतःच्या पैशातून त्याच्या वैयक्तिक खात्यात जमा केलेली कोणतीही रक्कम, परंतु व्याजापाटी जमा करण्यात आलेल्या रकमेचा यात समावेश असणार नाही;

**(तीन) "अखंड सेवा"** म्हणजे, खंड न पडलेली सेवा आणि आजारपण, अपघात, (असाधारण रजेसह) प्राधिकृत रजा, कर्मचाऱ्याचा दोष नसताना आणि / किंवा बेकायदेशीर नसलेल्या संपामुळे काम थांबणे यासंबंधातील अनुपस्थितीच्या कालावधीचा यात समावेश असेल;

---

**X सुधारपत्र क्रं. ५ दिनांक १८-७-१९९० अन्वये सुधारीत.**

**XX सुधारपत्र क्रं. १४ दिनांक २६-६-९८ अन्वेय सुधारित.**

परंतु एखाद्या बेकायदेशीर संपामुळे कर्मचाऱ्याच्या सेवेत पडणारा खंड मंडळ क्षमापित करील किंवा एकतर तो कर्मचारी व मंडळ यांच्यात समझोता झाल्यामुळे किंवा एखाद्या निवाडा दिला गेल्यामुळे त्या कर्मचाऱ्याच्या सेवेच्या अखंडतेला कोणताही बाध न येता तो सेवेत राहील त्याबाबतीत, अशा बेकायदेशीर संपामुळे त्याच्या सेवेत खंड पडणार नाही;

**(चार) "वित्तलब्धी" (एमॉल्युमेंट्स)** म्हणजे, (१) मूळ वेतन, (२) महागाई भत्ता, (३) वैयक्तिक वेतन, (४) विशेष वेतन, (५) आहारविषय सवलतीपोटी रोख रक्कम आणि असल्यास, प्रतिधारण भत्ता (रिटेनिंग अलाऊन्स), (६) सनदी लेखापाल असलेल्या कर्मचाऱ्यांना मिळणारा वैयक्तिक भत्ता, (७) लघुटंकलेखांना अनुज्ञेय असलेल्या लघुलेखन भत्ता, (८) स्वीयेतर सेवेत असलेल्या मंडळाच्या कर्मचाऱ्यांना मिळणारा प्रतिनियुक्ती भत्ता, (९) रोखपाल भत्ता आणि "वित्तलब्धी" या संज्ञेत अंतर्भूत करण्याचा मंडळ स्पष्टपणे निदेश देईल असे इतर कोणतेही भत्ते; परंतु अन्य सर्व भत्ते व वेतनेतर प्राप्ती व सवलती (परक्विझिट्स) या बाबींचा यात समावेश असणार नाही;

**टीप :** "प्रतिधारण भत्ता" म्हणजे, एखाद्या आस्थापनेचे काम बंद असेल तेव्हा कोमत्याही कालावधीकरिता कारखान्यातील एखाद्या कर्मचाऱ्याच्या सेवा काही काळ चालू ठेवण्यासाठी देय असलेला भत्ता.

**(पाच) "कर्मचारी"** म्हणजे, मंडळातील किंवा मंडळाच्या संबंधातील कोणत्याही शारीरिक कष्टाच्या किंवा अन्य प्रकारच्या कामासाठी वेतनावर सेवेत घेण्यात आलेली व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मंडळाकडून वेतन मिळणारी व्यक्ती होय आणि यात कंत्राटदाराकडून किंवा त्याच्यामार्फत मंडळातील किंवा मंडळाच्या संबंधातील कामासाठी सेवेत घेण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश असेल; परंतु व्यक्तिगत नोकर किंवा घरगडी अथवा एकेकाळी निधीची वर्णीदार असलेली परंतु त्यानंतर निधीत तिच्या नावे जमा झालेली संपूर्ण रक्कम काढून घेतलेली व्यक्ती यांचा यात समावेश असणार नाही.

**(सहा) "कुटुंब" म्हणजे –**

(क) पुरुष सदस्ययाच्या बाबतीत, त्याची पत्नी, विवाहित किंवा अविवाहित अपत्ये, त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे मातापिता आणि त्याच्या मृत मुलाची विधवा पत्नी व अपत्ये.

परंतु, एखाद्या सदस्याला लागू असणाऱ्या व्यक्तिविषयक कायद्यान्वये किंवा पतीपत्नी ज्या समाजातील आहेत त्या समाजाच्या रूढीप्राप्त कायद्यान्वये, त्याची पत्नी पोटगी मिळण्याच्या हक्कास मुकली आहे, असे तो सदस्य सिद्ध करील त्याबाबतीत, तिला आपल्या कुटुंबाचा घटक मानण्यात यावे अशी स्पष्ट नोटीस कालांतराने देऊन सचिवांना तसे कळवीत नाही तोपर्यंत, या विनियमांच्या प्रयोजनार्थ तिला त्या सदस्यांच्या कुटुंबाचा घटक मानले जाणार नाही; आणि

(ख) स्त्री सदस्यांच्या बाबतीत, तिचा पती, विवाहित किंवा अविवाहित अपत्ये, तिच्यावर अवलंबून असलेले तिचे मातापिता, तिच्या पतीचे अवलंबून असलेले मातापिता आणि तिच्या मृत मुलाची विधवा पत्नी व अपत्ये.

परंतु, अशा स्त्री सदस्याने, आपल्या पतीला कुटुंब या व्याख्येतून वगळण्यात यावे, अशी इच्छा लेखी

नोटीस देऊन सचिवास कळवली असेल त्याबाबतीत, कालांतराने लेखी नोटीस देऊन अशी नोटीस रद्द करीत नाही तोपर्यंत, तिचा पती व पतीचे अवलंबून असलेले मातापिता यांना त्यापुढे घटक मानले जाणार नाही.

**स्पष्टीकरण :** वरील दोन्हीपैकी कोणत्याही प्रकरणी, प्रकरणपरत्वे, जर त्या सदस्याचे अपत्य किंवा सदस्याच्या मृत मुलाचे अपत्य दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने दत्तक घेतले असेल आणि दत्तकग्राहीच्या व्यक्तिविषयक कायद्यानुसार असे दत्तकग्रहण कायदेशीर ठरत असेल तर, त्या सदस्याच्या कुटुंबातून त्या अपत्याला वगळण्यात आले आहे, असे समजण्यात यावे.

**टीप एक :** "अपत्ये" म्हणजे, औरस अपत्ये.

**टीप दोन :** वर्गणीदाराच्या व्यक्तिविषयक कायद्यात दत्तकग्रहणाला कायदेशीर मान्यता आहे व त्यामुळे अशा अपत्याला अगंज अपत्याचा दर्जा प्राप्त होऊ शकेल या गोष्टीची सक्षम अधिकाऱ्याची खात्री पटल्यानंतर केवळ त्याच प्रकरणी दत्तक अपत्याला "अपत्य" मानण्यात येईल.

**(सात) "स्वीयेतर सेवा"** म्हणजे, अशी सेवा की ज्या सेवेत मंडळाच्या कर्मचाऱ्याला मंडळाच्या सहमतीने अन्य एखाद्या नियोक्त्याकडून वेतन मिळत असते;

**(आठ) "निधी"** म्हणजे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्यनिर्वाह निधी;

**(नऊ) "रजा"** म्हणजे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सेवा विनियमांद्वारे मान्यता देण्यात आलेली कोणत्याही प्रकारची रजा;

**(दह) "शासन"** म्हणजे, महाराष्ट्र शासन;

**(अकरा) "वर्ष"** म्हणजे, दिनांक ३१ मार्च रोजी संपणारे वित्तीय वर्ष;

**(बारा) "विश्वस्त"** म्हणजे, निधीच्या व्यवस्थापनेचे काम सोपवण्यात आलेले विश्वस्त मंडळाचे सदस्य;

**(तेरा) "वर्गणी"** म्हणजे, विनियम क्र. १२ मध्ये विहित केलेल्या मर्यादांचा अधीन, विनियम क्र. १४ (एक) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कर्मचाऱ्याच्या वित्तलब्धीतून कापून घेतलेली रक्कम आणि / किंवा विनियम क्र. १४ (दोन) अनुसार कर्मचाऱ्याने भरलेली रक्कम; परंतु त्यामध्ये नियोक्त्याचे अंशदान म्हणून मंडळाने वर्गणीदाराच्या खात्यात भरलेल्या आणि / किंवा जमा केलेल्या रक्कमांचा समावेश होत नाही;

**(चौदा) "वर्गणीदार"** अथवा **"सदस्य"** म्हणजे, निधीचा सदस्य होण्यास पात्र असल्याने तसे होण्यास परवानगी देण्यात आलेला व ज्याचा हिशेब अंतिमरीत्या चुकता करण्यात आलेला नाही, असा कर्मचारी;

**(पंधरा) "सरकारी प्रतिभूति"** या संज्ञेला लोक ऋण अधिनियम, १९४४ (१९४४ चा अठरावा) यात जो अर्थ नेमून दिला आहे तोच असेल;

**(सोळा) "सचिव"** म्हणजे, मंडळाचा सचिव किंवा या विनियमांन्वये बंधकारक ठरवण्यात आलेली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी मंडळाने अधिकार दिलेला "वित्त सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकारी"

किंवा कोणताही अन्य अधिकारी;

(सतरा) **"कर्मचाऱ्याला देय असलेलली संचित शिल्लक"** म्हणजे, तो मंडळाचा कर्मचारी राहणे बंद झाल्यावर ज्या तारखेला त्याच्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यातील रक्कम चुकती करणे आवश्यक असेल त्या तारखेला निधीच्या विनियमान्वये दावायोग्य असेल अशी त्याच्या खाती जमा असलेली शिल्लक रक्कम किंवा तिचा भाग;

(अठरा) **"वगळलेला कर्मचारी"** म्हणजे;

(क) निधीच्या सदस्यत्वानंतर वयाची ५५ वर्षे पूर्ण झाल्याच्या तारखेला किंवा त्या तारखेनंतर किंवा भारतीय नागरिक असल्याने भारतातून कायम वास्तव्यसाठी दुसऱ्या देशात जातेवेळे, निधीत त्याच्या खाती जमा असलेली संपूर्ण रक्कम काढतो असा कर्मचारी;

**(ख) शिकाऊ उमेदवार...**

स्पष्टीकरण : शिकाऊ उमेदवार म्हणजे मंडळाला लागू असलेल्या प्रमाणित स्थायी आदेशांनुसार शिकाऊ उमेदवार असलेली किंवा समुजित शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याकडून शिकाऊ उमेदवार म्हणून घोषित करण्यात आलेली व्यक्ती; आणि

(ग) निधीचा सदस्य होण्यास अन्यथा पात्र असताना दरमहा X (तीन हजार पाचशे) रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारा कर्मचारी; मात्र दरमहा X ( रु. ३५००) पेक्षा अधिक वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्याला, मंडळाने तशी अनुमती दिल्यास, निधीचा सदस्य करून घेता येईल.

स्पष्टीकरण : या पोटविनियमाच्या प्रयोजनास्तव, "वेतन" यात मूळ वेतनासह महागाई भत्ता, प्रतिधारण भत्ता (कोणताही असल्यास) आणि त्यावर अनुज्ञेय असणाऱ्या आहारविषयक सवलतीपोटी रोख रकमा यांचा समावेश असेल.

(२) कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ व तदन्वये तयार केलेली योजना, त्याचप्रमाणे भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९२५ (१९२५ चा एकोणीसावा) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सेवा विनियम यांमध्ये व्याख्या करण्यात आले असतील असे या विनियमांमध्ये वापर केलेले कोणतेही अन्य शब्दप्रयोग यांचा अर्थ, शक्य तेथवर त्यांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणेच असेल.

यात व्याख्या न करण्यात आलेल्या इतर सर्व शब्दांचा व शब्दप्रयोगांचा अर्थ, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ व तदन्वये तयार केलेली योजना यात अनुक्रमे त्यांना जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच असेल.

**नियम - ३ : नियंत्रण**

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे, विनियम क्र. ५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, निधीचे व्यवस्थापन सोपवण्यात आलेला विश्वस्त मंडळामार्फत, या निधीचा कारभार पाहिल.

---

**X सुधार पत्र क्र. १० दि. १८-११-१९९३ अन्वये बदल**

**नियम - ४ (एक) : सदस्यत्व**

क (१) हे विनियम, या विनियमांमध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याच्या व्यतिरिक्त, X (दि. १-११-१९९० पासून मंडळात रूजू झालेल्या तारखेपासून) मंडळाच्या निवृत्तीवेतनयोग्य नसलेल्या सेवेतील सर्व कर्मचाऱ्यांना लागू होतील.

परंतु, निवृत्तिवेतनयोग्य सेवेतील ज्या कर्मचाऱ्याला, कोणतेही निवृत्ति वेतनविषयक नियम लागू होणे चालू राहण्यास अनुमती दिली असेल अशा कोणत्याही कर्मचाऱ्याला हे विनियम लागू होणार नाहीत.

आणखी असे की, असा कोणताही कर्मचारी व मंडळ यांच्यामध्ये झालेला, हे विनिमय त्याला लागू करण्याबाबतच्या तरतुदींखेरीज अन्य तरतुदी असलेला भविष्यनिर्वाह निधी संबंधातील एखादा करार अस्तित्वात असेल तर त्याला हे विनियम लागू होणार नाहीत. परंतु अशा करारात, हे विनियम त्याला लागू करण्याची तरतूद असेल तेव्हा त्या करारातील तरतुदींच्या अधीन, ते त्याला लागू करण्यात येतील.

(२) मंडळाच्या सेवेत दाखल होण्यापूर्वी जो कर्मचारी दुसऱ्या एखाद्या नियोक्त्याच्या विद्युत केंद्रात / कारखान्यात किंवा आस्थापनेत नोकरीला असेल व अशा विद्युत केंद्रातील / कारखान्यातील किंवा आस्थापनेतील भविष्यनिर्वाह निधीला कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, १९५२ व तदन्वये तयार केलेली योजना लागू असेल किंवा त्यातील भविष्यनिर्वाह निधीला कलम १७ (१) अन्वये सूट देण्यात आली असेल किंवा कर्मचारी भविष्ययनिर्वाह निधी योजनेतील परिच्छेद २७ व २७-क अन्वये सूट देण्यात आली असेल तर तो कर्मचारी मंडळाच्या सेवेत दाखल होण्याच्या तारखेपासून निधीचा सदस्य होण्यास हक्कदार असेल व त्याने तसे करणे आवश्यक असेल, परंतु त्यासाठी त्याची त्या भविष्यनिर्वाह निधीतील मागील जमा रक्कम या निधीकडे हस्तांतरित करण्यात आली पाहिजे. अशा प्रकरणी, नियोक्त्याचा हिस्सा त्याला प्रदान करताना पूर्वीच्या नियुक्त्याकडील त्याची मागील सेवा हिशेबात घेण्यात येईल.

(३) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२ च्या कलम १७ अन्वये मंडळाला देण्यात आलेलली सूट समाप्त होईल किंवा ती रद्द करण्यात येईल तेव्हा, उक्त अधिनियमाच्या तरतुदींन्वये कर्मचारी ताबडतोब किंवा कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी योजनेनुसार ज्या तारेखेला ते सदस्य होण्यास हक्कदार ठरतील व त्यांना सदस्य होणे आवश्यक ठरेल त्या तारखेपासून ते त्या योजनेचे सदस्य होतील आणि प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेली रक्कम त्या सांविधिक निधीकडे हस्तांतरित केली जाईल.

XX स्पष्टीकरण : वगळले

XX (क) वगळले

XX (ख) वगळले

XX (ग) वगळले

---

**X सुधारपत्र क्र. १० दिनांक १८-११-१९९३ अन्वये बदल .**
**XX सुधारपत्र क्र. १० दि.१८-११-१९९३ अन्वये वगळले.**

**४ (एक) ख.** मंडळाचा एकादा कर्मचारी प्रकरणपरत्वे, विनियम क्र. २९, ३०, ३१ आणि / किंवा ३२ यातील तरतुदींन्वये निधीमध्ये त्याच्या खात्यात जमा असलेली रक्कम काढून घेणार नाही तोपर्यंत तो निधीचा सदस्य असणे चालू राहील.

या विनियमान्वये सदस्याने परताव्याची मागणी करण्याच्या प्रकरणी, त्याने मागणी केल्याची तारीख कोणतीही असली तरी त्याचे प्रदान देण्यास सक्षम अधिकारी ज्या तारखेला प्राधिकृत करील त्या तारखेपासून त्याचे निधीचे सदस्यत्व समाप्त झाले आहे, असे मानण्यात येईल.

एखादा कर्मचारी निधीचा सदस्य होण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास हक्कदार आहे अथवा त्याने सदस्य होणे किंवा सदस्य म्हणून चालू राहणे आवश्यक आहे किंवा कसे किंवा कोणत्या तारखेपासून असा सदस्य होण्याची / हक्कदार होण्याची किंवा सदस्य होणे आवश्यक असल्याची तारीख यासंबंधात कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबत प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताचा निर्णय अंतिम असेल.

**नियम - ४ क**

(१) मंडळाच्या सेवेत येण्यापूर्वी इतरत्र कोठेही सेवेत नसलेल्या आणि त्याच्यामाणे कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ व तद्न्वये तयार केलेली योजना लागू नसलेल्या कारखान्यातून / आस्थापनेतून मंडळाच्या सेवेत आलेले कर्मचारी, X (मंडळाच्या सेवेत रुजू झाल्याबरोबर) विहित नमुन्यातील (नमुना १३) प्रतिज्ञापन संवितरण अधिकाऱ्यामार्फत सचिवाला सादर करतील आणि प्रकरणपरत्वे, ते X (मंडळात रुजू झालेल्या तारखेपासून) मंडळाची अंशदायी भविष्यनिर्वाह निधी वर्गणी भरण्यास तो अधिकारी त्यांना पात्र ठरवील, (दि. १-११-१९९० पासून लागू.) प्रतिज्ञापन नमुन्याची छाननी केल्यानंतर सचिव त्यांना खाते क्रमांक नेमून देईव व वर्गणीदारांना तसे कळवण्याची सूचना संबंधित अधिकऱ्याला देईल.

(२) मंडळाच्या नियुक्ती होण्यापूर्वी जो कर्मचारी, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ व तद्न्वये तयार केलेली योजना लागू असणाऱ्या आस्थापनेचा / कारखान्याचा कर्मचारी होता आणि / अथवा कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, १९५२ च्या कलम १७ अन्वये सूट दिलेल्या किंवा तद्न्वये तयार करण्यात आलेल्या योजनेतील परिच्छेद ७९ अन्वये शिथिलतेची सवलत दिलेल्या आस्थापनेतील/ कारखान्यातील भविष्यनिर्वाह निधीचा सदस्य होता किंवा योजनेच्या परिच्छेद २७ अन्वये सूट दिलेला कर्मचारी होता असा कर्मचारी, मंडळाच्या सेवेत दाखल झाल्यानंतर तात्काळ संबंधित संवितरण अधिकाऱ्यामार्फत (विहित) नमुन्यातील (नमुना १४) प्रतिज्ञापन सादर करील आणि ते प्रतिज्ञापन मिळाल्यानंतर तो अधिकारी कर्मचाऱ्याच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी तात्काळ वसूल करण्याची व्यवस्था करील आणि उक्त प्रतिज्ञापनाच्या नमुन्याची पडताळणी केल्यानंतर त्या कर्मचाऱ्याची भविष्यनिर्वाह निधीत कोणतीही रक्कम जमा असल्यास ती त्या कर्माचाऱ्याच्या अगोदरच्या नियोक्त्याकडून / प्रादेशिक भविष्य निर्वाह निधीआयुक्ताकडून वसूल

---

**X सुधारपत्र क्र. १० दिनांक १८-११-१९९३ अन्वये वगळण्यात आले**

**XX सुधारपत्र क्र. १० दिनांक १८-११-१९९३ अन्वये बदल.**

करण्यासाठी सचिव कार्यवाही करील. सचिव, भविष्यनिर्वाह निधीतील मागील जमा रक्कम स्वीकारील व त्या कर्मचाऱ्याच्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यात जमा करील. या कर्मचाऱ्याला नियोक्त्याचा हिस्सा प्रदान करण्यासाठी त्याच्या अगोदरच्या नियोक्त्याकडील त्याची झालेली सेवा हिशेबात घेण्यात येईल.

तथापि, कर्मचारी आपला खाते क्रमांक आणि / किंवा आपल्या पूर्वीच्या नियोक्त्याचे नाव तपशील यांसारखा आवश्यक तो तपशील सादर करण्यास असमर्थ ठरेल त्याबाबतीत, मंडळाचा प्रभारी अधिकारी त्याला तसे करण्यास भाग पाडील आणि तो कर्मचारी, मागणी केल्यावरून, पूर्वीच्या नियोक्त्यांबरोबर प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताबरोबर पत्रव्यवहार करता यावा यासाठी स्वतःबद्दल व त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीबद्दल तपशील सादर करील. प्रभारी अधिकारी हा तपशील विहित केलेल्या नामनिर्देशन व प्रतिज्ञापन नमुन्यांमध्ये (प्रकरणपरत्वे नमुना क्र. १ व २ आणि १३ व १४) भरून घेईल आणि त्यांवर संबंधित कर्मचाऱ्याची सही किंवा अंगठा घेईल.

**टीप :** कर्मचाऱ्यांची वर्गणी देय झाल्यानंतर ती वसूल करण्याचे चुकून राहून गेले तर संवितरण अधिकारी नियमित वर्गणीबरोबर राहिलेली थकबाकीही योग्य त्या मासिक हप्त्यांमध्ये, परंतु असा प्रत्येक माहिस हप्ता नियमित मासीक वर्गणीपेक्षा कमी नसेल व त्या हप्त्यांची एकूण संख्या बारापेक्षा अधिक नसेल अशा रीतीने, वसूल करण्याची व्यवस्था करील.

**(३) खात्याचे हस्तांतरण व स्वीकृति**

**(एक)** एखाद्या कर्मचारी मंडळातील नोकरी सोडून दुसऱ्या एखाद्या आस्थापनेत नोकरीला राहील त्यावेळी त्या आस्थापनेला कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ लागू असेल तर त्या कर्मचाऱ्यच्या खाती जमा असलेली रक्कम त्या दुसऱ्या आस्थापनेतील भविष्यनिर्वाह निधीकडे पूर्णपणे हस्तांतरयोग्य असेल. परंतु ज्या दुसऱ्या आस्थापनेत तो नोकरीला राहील त्या आस्थापनेत आयकर अधिनियम, १९६१ अन्वये मान्यता देण्यात आलेला खाजगी भविष्यनिर्वाह निधी असेल किंवा त्या आस्थापनेला भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९२५ लागू असेल त्याबाबतीत, त्या कर्मचाऱ्याने मागणी केली व नियोक्त्याने निधीचे हस्तांतरण स्वीकारण्यास संगती दिली तर, समपहरणाशिवाय (विदाऊट फोरफिचर) संपूर्ण जमा रक्कम हस्तांतरणयोग्य असेल.

**(दोन)** हे विनियम लागू होणारा प्रत्येक कर्मचारी हा निधीचा वर्गणीदार असेल.

**(तीन)** मंडळाच्या सेवेत असेपर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला निधीचा राजीनामा देण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**(चार)** कोणत्याही वर्गणीदाराची मंडळातील सेवा कोणत्याही कारणाने समाप्त झाल्यास तो निधीचा वर्गणीदार सदस्य राहण्याचे बंद होईल, परंतु त्याच्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यातील हिशेब चुकता करण्यात येईपर्यंत त्याचे सदस्यत्व चालू आहे, असे मानण्यात येईल.

**टीप :** (एक) शिकाऊ उमेदवार (कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ यात व्याख्या केल्याप्रमाणेचा) निधीचा वर्गणीदार होण्यास हक्कदार नसेल.

(दोन) रोजंदार व कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचारी निधीचे वर्गणीदार होण्यास पात्र असतील; परंतु या विनियमांतील इतर आवश्यकता त्यांनी पूर्ण केल्या पाहिजेत.

**नियम - ५ : विश्वस्त**

**(एक)** विश्वस्तव्यवस्थेच्या अधीन विश्वस्तांमध्ये निधी निहित असेल आणि या निधीचे सर्व लाभाधिकारी (बेनिफिशरिज) आणि प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त यांच्या संमतीशिवाय तो रद्द करण्याजोगा नसेल. निधीचे सर्वंकष नियंत्रण व व्यवस्थापन विश्वस्तमंडळाकडे असेल. हा निधी, विनियम क्र. १४ व १५ अनुसार विश्वस्तांकडे आलेली अंशदाने, त्यापासून जमा झालेल्या रकमा आणि अशी अंशदाने व जमा झालेल्या रकमा यांचे व त्यापासून खरेदी करण्यात आलेल्या रोख्यांचे जमा करण्यात आलेले व्याज आणि भांडवली मत्तांच्या हस्तांतरणामुळे झालेला कोणताही भांडवली लाभ, यांचा मिळून बनलेला असेल व याशिवाय इतर कोणत्याही रकमांचा त्यामध्ये समावेश असणार नाही.

**(दोन)** विश्वस्तमंडळ हे, कर्मचऱ्यांच्या व नियोक्त्याच्या समान संख्या असलेल्या प्रतिनिधींचे मिळून होईल. निरनिराळ्या शाखांतील / विभागांतील कर्मचाऱ्यांना, शक्य होईल तेथवर, प्रतिनिधीत्व देता येईल अशाप्रकारे त्यातील विश्वस्तांची संख्या निश्चित करण्यात येईल.

(क) विश्वस्तमंडळावरील विश्वस्तांची संख्या सहापेक्षा कमी व बारापेक्षा अधिक असू नये. यापैकी निम्मे प्रतिनिधी, ते आपल्या व्यवस्थापकीय किंवा प्रशासनिक अधिकाऱ्यांमधून नामनिर्दिष्ट करील व त्यांच्यापैकी एक मंडळाचा (म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा) सदस्य असेल व तो विश्वस्त मंडळाचा पदसिध्द अध्यक्ष असेल. उर्वरित निम्मे विश्वस्त मंडळाच्या भविष्यनिर्वाह निधीचे वर्गणीदार असलेल्या "पात्र कर्मचाऱ्यांचे" प्रतिनिधी असतील. प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्तांनी घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार गुप्त मतदान पद्धतीने कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी निवडण्यात येतील.

**टीप :** उपर्युक्त पोटनियम ५ (दोन) (क) यात येणाऱ्या **"अध्यक्ष" या शब्दप्रयोगाचा अर्थ विश्वस्त मंडळाचा अध्यक्ष असा आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अध्यक्ष असा नाही.**

परंतु, आचार संहितेन्वये किंवा कोणत्याही राज्य अधिनियमान्वये एखादी मान्यताप्राप्त कामगार संघटना असेल त्याबाबतीत अशी संघटना कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी नामनिर्देशित करील.

आणखी असे की, एखादी मान्यताप्राप्त कामगार संघटना नसेल त्याबाबतीत, कामगार संघटनेला मान्यता देण्याच्या बाबतीत नियमन करणाऱ्या कोणत्याही कायद्यानुसार अस्तित्वात असणारी प्रातिनिधीक संघटना कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी नामनिर्देशित करील.

तसेच, जेव्हा मान्यताप्राप्त कामगार संघटना किंवा प्रातिनिधीक संघटनाही नसेल त्याबाबतीत, मंडळात अस्तित्वात असलेली व मान्यता मिळण्यास पात्र असलेली कोणतीही कामगार संघटना कर्मचाऱ्यांचे

प्रतिनिधी नामनिर्देशित करील. जेव्हा अशा संघटना एकापेक्षा अधिक असतील तेव्हा, कार्य समितीवर (वर्क्स कमिटी) कामगारांचे प्रतिनिधी निवडून देण्याकरिता, औद्योगिक विवाद (केंद्रीय) नियम, १९५७ मध्ये घालून दिलेली कार्यपद्धती, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्तांना आवश्यक वाटतील अशा कोणत्याही सुधारणांसह, अनुसरण्यात येईल.

(ख) निधीचा विश्वस्त २१ वर्षांपेक्षा कमी वयाचा नसेल.

(ग) मावळता विश्वस्त, प्रकरणपरत्व, पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा नामनिर्दिष्ट केला जाण्यास पात्र असेल.

**(तीन)** या विनियमांच्या अनुसार निधीचे व्यवस्थापन करणे हे विश्वस्तांचे कार्य व उत्तरदायित्व असेल.

**(चार)** (क) मंडळ सदस्य वगळता एखादा विश्वस्त त्याच्या पदावर पाच वर्षे किंवा तो मृत्यू पावेपर्यंत किंवा मंडळ विश्वस्त पदावरून त्याला दूर करीपर्यंत किंवा काढून टाकीपर्यंत किंवा तो राजीनामा देईपर्यंत किंवा ज्या हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करणे अपेक्षित होते ते प्रतिनिधीत्व करण्याचे बंद होईपर्यंत, विश्वस्त म्हणून राहणे चालू राहील आणि वरीलपैकी किंवा यात पुढे निर्देष्ट केलेली कोणतीही घटना घडल्यास, मंडळ, वरील पोटविनियम (दोन) यात विहित केलेल्या रीतीने त्या विश्वस्ताचा उत्तराधिकारी नामनिर्दिष्ट करील व त्याची तशी नेमणूक करील आणि असा उत्तराधिकारी त्यानंतर अशा विश्वस्ताच्या रिक्त पदावरील विश्वस्त असेल व तो तसा राहील. असे आकस्मिक रिक्त पद भरण्यासाठी नेमलेला किंवा निवडून दिलेला विश्वस्त, त्याला ज्या विश्वस्ताच्या जागी नेमले असेल किंवा निवडून दिले असेल त्या पदाच्या उर्वरित मुदतीकरिता ते पद धारण करील.

परंतु, कोणताही विश्वस्त हा, उक्त पाच वर्षांची मुददत संपली असली तरी, त्याच्या उत्तराधिकाऱ्याच्या नेमणुकीबाबत सूचना जारी करण्यात येईपर्यंत, पद धारण करणे चालू ठेवील.

आणखी असे की, विश्वस्तमंडळाच्या अध्यक्षाच्या नावे पत्र पाठवून विश्वस्ताला राजीनामा देता येईल आणि ज्या तारखेला त्याचा राजीनामा स्वीकारण्यात येईल त्या तारखेपासून त्याला विश्वस्तपदावरून मुक्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(ख) विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षाकडून अनुपस्थितीची परवानगी न घेता जो सदस्य लागोपाठच्या तीन बैटकींना गैरहजर राहील तो विश्वस्त म्हणून राहणे बंद होईल. परंतु त्याच्या अनुपस्थितीची कारणे वाजवी आहेत याबाबत विश्वस्तमंडळाच्या अध्यक्षाची खात्री पटल्यास तो त्याचे विश्वस्तपद कायम टेवील.

(ग) एखाद्या व्यक्तीला खालीलपैकी कोणत्याही कारणावरून विश्वस्त म्हणून अपात्र ठरवण्यात येईलः

(एक) सक्षम न्यायालयाने त्या व्यक्तीला विकल मनाची व्यक्ती म्हणून घोषित करणे;

(दोन) ती व्यक्ती अमुक्त दिवाळखोर (अनडिस्चार्ज्ड इन्सॉल्व्हंट) असणे;

(तीन) विश्वस्त म्हणून नेमणूक होण्यापूर्वी किंवा झाल्यानंतर ती व्यक्ती नैतिक अधःपतन समजल्या जाणाऱ्या अपराधासाठी दोषी ठरणे;

(घ) विश्वस्तमंडळाच्या रचनेबाबत कोणताही विवाद उद्‌भवल्यास किंवा संशय निर्माण झाल्यास ते प्रकरण प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताकडे पाठवण्यात यावे आणि त्या प्रकरणी आयुक्ताचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

**(पाच)** (क) विश्वस्तांची संख्या सहापेक्षा अधिक नसल्यास गणपूर्तीसाठी चार विश्वस्तांची उपस्थिती आवश्यक असेल. जर ही संख्या सहापेक्षा अधिक परंतु दहापेक्षा कमी असेल तेव्हा गणपूर्तीसाठी सहा विश्वस्तांची उपस्थिती आवश्यक असेल. विश्वसांची संख्या दहापेक्षा अधिक असेल तेव्हा गणपूर्तीसाठी आठ विश्वस्तांची उपस्थिती आवश्यक असेल.

**गणपूर्तीसाठी दोन्ही बाजूचे विश्वस्त समान संख्येने उपस्थित असले पाहिजेत.**

(ख) कोणत्याही बैठकीत उपस्थित विश्वस्तांची संक्या गणपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या संख्येपेक्षा कमी असेल तेव्हा, विश्वस्त मंडळाचा अध्यक्ष, या मूळ बैठकीच्या तारखेपासून सात दिवसांनंतरची नसेल अशा तारखेपर्यंत ही बैठक तहकूब करील व अशी तहकूब केलेली बैठक पुन्हा घेण्याची तारीख, वेळ व ठिकाण विश्वस्तांना कळवील आणि त्यानंतर अशा तहकूब केलेल्या बैठकीतील कामकाज त्या बैठकीत निकालात काढणे कायदेशीर असेल मग त्यावेळी कितीही विश्वस्त त्या बैठकीला उपस्थित असोत.

(ग) खालील पोटनियम ५ (पाच) (घ) मधील तरतुदीस अधीन राहून, विश्वस्त मंडळाच्या बैठकी,, अध्यक्ष ठरवील अशा ठिकाणी व अशा वेळेस होतील.

अध्यक्षास योग्य वाटेल त्यावेळी त्याला बैठक बोलावता येईल. त्याचप्रमाणे अध्यक्ष वगळता सर्व सदस्यांपैकी एक तृतियांशपेक्षा कमी नसतील एवढ्या सदस्यांनी लेखी मागणी केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत बैठक बोलवील.

(घ) विश्वस्त मंडळाच्या बैठकीची तारीख, ठिकाण व वेळ त्याचप्रमाणे त्या बैठकीत पार पाडावयाचे कामकाज या गाष्टींचा अंतर्भाव असलेली, डाकेने ज्या तारखेला पाठवण्यात येईल त्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा कमी मुदत नसेल अशी नोटीस, प्रत्येक विश्वस्ताला नोंदणीकृत डाकेने किंवा संदेशवाहकामार्फत पाठवण्यात येईल.

परंतु, अध्यक्षाला तातडीचे वाटेल अशा एखाद्या प्रकरणाचा विचार करण्यासाठी तो बैठक बोलावील तेव्हा, त्याला आवश्यक वाटेल एवढ्या वाजवी मुदतीची नोटीस पुरेशी आहे असे मान्यण्यात येईल.

(च) विश्वस्त मंडळाच्या ज्या बैठकीला अध्यक्ष हजर असेल त्या बैठकीचे अध्यक्षस्थान तो स्वीकारील. ज्यावेळी अध्यक्ष बैठकीला हजर नसेल त्यावेळी त्या बैठकीचा अध्यक्ष म्हणून त्यावेळी हजर असलेले विश्वस्त आपल्यापैकी एका विश्वस्ताची निवड करतील व अशा रीतीने अध्यक्ष म्हणून निवड केलेला सदस्य हा, त्या बैठकीत, अध्यक्षाला असणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करील.

(छ) विश्वस्त मंडळाच्या बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये, इतर गोष्टींबरोबर, बैठकीला हजर असलेल्या विश्वस्तांची नावे नमूद केलेली असतील व ते कार्यवृत्त बैठकीच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत सर्व विश्वस्तांमध्ये प्रसृत करण्यात येईल. त्यानंतर त्या कार्यवृत्ताची, एक कायम अभिलेख म्हणून कार्यवृत्त पुस्तकात नोंद करण्यात येईल.

प्रत्येक बैठकीच्या कार्यवृत्तात एखादा फेरफार करणे आवश्यक आहे असे लगतनंतरच्या बैठकीत ठरल्यास तसा तो करून त्या कार्यवृत्ताचे निश्चितीकरण केल्यावर अध्यक्ष त्यावर सही करील. अशा निश्चितीकरण केलेल्या कार्यवृत्तांच्या प्रती नेहमीच प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताकडे पाठवण्यात येतील.

(ज) प्रकरणपरत्वे, विश्वस्त मंडळात एखादे पद रिक्त आहे किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष आहे याच केवल कारणावरून विश्वस्त मंडळाचे कामकाज अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही.

**(सहा)** विश्वस्त मंडळाच्या बैठकीत उद्‌भवणाऱ्या प्रश्नांवर बहुमताने निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास अध्यक्ष आपल्या निर्णायक मताचा वापर करील; परंतु, अध्यक्षांच्या निर्णायक मतामुळे कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधांना बाध येणार असेल तर त्याविरुद्ध प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताकडे अपील करता येईल व याबाबतीत त्याने दिलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

**नियम - ६ :**

कर्मचाऱ्यांना भविष्यनिर्वाह निधी संबंधातील ज्या देय रकमा शासनाला आणि / किंवा मुंबई राज्य विद्युत मंडळाला रोख्यांच्या आणि / किंवा रोख रकमेच्या स्वरूपात प्राप्त झाल्या असतील असे सर्व रोखे आणि / किंवा रोख रकमा शासनाकडून अन्य संबंधित संघटनांकडून निधीकडे हस्तांतरित करून घेण्याची व्यवस्था विश्वस्त मंडळाला करता येईल.

**नियम - ७ : निधीचे व्यवस्थापन**

उक्त भविष्यनिर्वाह निधीचे सर्वकष नियंत्रण विश्वस्त मंडळात निहित असेल आणि वर्गणीदारांना तात्पुरती कर्जे मंजूर करणे व त्यांची वसुली करणे, प्रत्येक वर्गणीदाराचे स्वतंत्र खाते ठेवणे व या गोष्टींशी संबंधित असलेल्या इतर बाबी यासह त्याच्या प्रत्यक्ष प्रशासनाचे कार्य विश्वस्तांच्या वतीने सचिव किंवा त्याच्याकडून आणि / किंवा मंडळाकडून अधिकार प्रदान करण्यात आलेला अन्य कोणताही अधिकारी करील. निधीची खाती मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच म. रा. वि. मंडळाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात ठेवण्यात येतील आणि त्यांची लेखापरीक्षा मंडळाच्या अंतर्गत लेखा परीक्षा पथकाकडून त्याचप्रमाणे सांविधिक लेखापरीक्षकांकडून करण्यात येईल.

**नियम - ८ (एक) : नामनिर्देशन**

कर्मचारी, निधीचा वर्गणीदार झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर तो त्याच्या खाती निधीत असलेली जमा रक्कम, ती देय होण्यापूर्वी अथवा ती देय झाली असली तरी त्याला ती दिली जाण्यापूर्वी त्याचा मृत्यू झाल्यास ती रक्कम मिळण्याचा हक्क एका किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना प्रदान करणारे नामनिर्देशन सचिवाला सादर करील.

परंतु, नामनिर्देशन करण्याच्या वेळी वर्गणीदारास कुटुंब असल्यास, असे नामनिर्देशन त्याच्या कुटुंबातील सदस्यांखेरीज अन्य कोणाही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे नसेल. सदस्यांच्या कुटुंबातील नसलेल्या एखाद्या व्यक्तीच्या नावे कोणतेही नामनिर्देशन करून दिल्यास ते विधिअग्राह्य असेल.

जर नामनिर्देशन करून देते वेळी सदस्याचे कुटुंब नसेल तर तो कोणत्याही एका किंवा अनेक व्यक्तींच्या नावे नामनिर्देशन करून देऊ शकेल परंतु त्यानंतर त्या सदस्याने कुटुंब संपादन केले तर, असे नामनिर्देशन तात्काळ विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येईल आणि तो सदस्य त्याच्या कुटुंबातील एका किंवा अनेक व्यक्तींच्या नावे नामनिर्देशन करून देईल.

**(दोन)** पोटविनिमय (एक) अन्वये वर्गणीदार एकापेक्षा अधिक व्यक्ती नामनिर्देष्ट करील त्याबाबतीत, कोणत्याही वेळी त्याच्या खात्यात जमा असणाऱ्या पूर्ण रकमेचा समावेश होईल, अशा रीतीने प्रत्येक नामनिर्दिष्ट व्यक्तीला देय असणाऱ्या रकमेचा हिस्सा नामनिर्देशनात विनिर्दिष्ट करील.

**(तीन)** त्या त्या परिस्थितीत लागू होऊ शकेल त्याप्राणे असे नामनिर्देशन नमुना क्र. १ किंवा नमुना क्रर. २ यापैकी एका नमुन्यात असेल.

**(चार)** वर्गणीदाराला, सचिवास लेखी नोटीस पाठवून कोणत्याही वेळी नामनिर्देशन रद्द करता येईल.

परंतु, वर्गणीदार, अशा नोटीशी बरोबरच, या विनियमांतील तरतुदींनुसार केलेले नवीन नामनिर्देशन पाठवील.

**(पाच)** वर्गणीदाराला नामनिर्देशनात खालील बाबींची तरतूद करता येईल :

(क) वर्गणीदार मरण पावण्यापूर्वी त्याने नामनिर्दिष्ट केलेली कोणतीही विनिर्दिष्ट व्यक्ती मरण पावेल तेव्हां त्या व्यक्तीला प्रदान करण्यात आलेला हक्क, नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेल्या अन्य व्यक्तीकडे जाणे;

(ख) नामनिर्देशनात विनिर्दिष्ट करण्यात आलेली एखादी आकस्मिक घटना घडल्यास ते विधिअग्राह्य ठरणे, परंतु, कोणत्याही वेळी नामनिर्देशन करताना, वर्गणीदाराला कुटुंब नसेल तेव्हां, नंतर त्याने कुटुंब संपादन केल्यास ते नामनिर्देशन विधिअग्राह्य होईल, अशी तरतूद तो नामनिर्देशनात करील.

**(सहा)** पोटविनिमय (पाच) च्या खंड (क) अन्वये, नामनिर्देशनात विशेष तरतूद न केलेल्या नामनिर्दिष्ट व्यक्तीच्या मृत्युनंतर किंवा पोटविनियम (पाच) च्या खंड (ख) अन्वये नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल अशी कोणतीही घटना घडल्यानंतर वर्गणीदार, असे नामनिर्देशन रद्द करणारी लेखी नोटीस व त्यासोबत या विनिमयातील तरतुदींच्या आधारे केलेले नवीन नामनिर्देशन तात्काळ सचिवाकडे सादर करील.

**(सात)** वर्गणीदाराने केलेले प्रत्येक नामनिर्देशन व नामनिर्देशन रद्द करण्यासंबंधात पाठवलेली प्रत्येक नोटीस, असे नामनिर्देशन किंवा नोटीस विधिग्राह्य असेल तेथवर, सचिवाला ज्या तारखेला मिळेल त्या तारखेपासून परिणामक ठरेल.

**(आठ)** पूर्वीचे मध्य प्रदेश विद्युत मंडळ, सौराष्ट्र विद्युत मंडळ, मुंबई विद्युत मंडळ अथवा शासनाचा वीज विभाग किंवा पूर्वीचे मुंबई राज्य विद्युत मंडळ या ठिकाणी सेवेत असताना किंवा कर्मचारी भविष्यनिर्वाह

निधी योजनेचा सदस्य असताना एखाद्या वर्गणीदाराने कोणतेही नामनिर्देशन करून दिले असल्यास, नंतर त्याने ते रद्द केलेले नसेल किंवा कोणत्याही विशिष्ट प्रकरणी अन्यथा विधिअग्राह्य ठरणार नसेल तर, ते जणू काही या विनियमांन्वये करून देण्यात आलेले नामनिर्देशन आहे असे मानण्यात येईल.

**नियम - ९ : वर्गणीदाराचे खाते**

प्रत्येक वर्गणीदाराच्या नावाने एक स्वतंत्र खाते उघडण्यात येईल व त्यात पुढील रक्कमा जमा करण्यात येतील :

(एक) वर्गणीदाराची वर्गणी :

(दोन ) विनिमय १५ अन्वये मंडळाने त्याच्या खात्यात जमा केलेले अंशदान;

(तीन) विनियम १६ अन्वये तरतूद करण्यात आलेले वर्गणीवरील व्याज आणि

(चार) विनिमय १६ अन्वये तरतूद करण्यात आलेले अंशदानावरील व्याज.

**नियम - १० : प्रत्येक वर्गणीदाराचा स्वतंत्र हिशेब ठेवणे**

**(क)** प्रत्येक वर्गणीदाराचा स्वतंत्र हिशेब ठेवण्यात येईल व त्यात त्याची स्वतःची वर्गणी व त्यावर प्राप्त झालेले व्याज, तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मासिक अंशदानाचा त्याचा हिस्सा व त्यावर प्राप्त झालेले व्याज यासंबंधीच्या रकमा दर्शविण्यात येतील. हा हिशेब पूर्ण रुपयांत ठेवण्यात येईल व त्यासाठी ५० पैसे किंवा त्याहून अधिक भाग पूर्ण रुपया म्हणून हिशोबात घेण्यात येईल, तर ५० पैशापेक्षा कमी भाग हिशेबात घेण्यात येणार नाही.

**(ख)** निधीच्या प्रत्येक वर्गणीदाराचे खाते ठेवण्यात येईल व त्यात (सोबत जोडलेल्या) नमुना क्र. ३ मध्ये दर्शविलेला तपशील असेल.

**(ग)** प्रत्येक वर्गणीदाराला प्रत्येक वर्षी ३० सप्टें बरपर्यंत त्याच्या मागील वर्षाच्या हिशेबाचे विवरणपत्र देण्यात येईल. या विवरणपत्रात (सोबत जोडलेल्या नमुना क्र. ४) खालील तपशील असेल;

(एक) त्या वर्षाच्या १ एप्रिल रोजी असलेली कर्मचाऱ्याच्या वर्गणीची तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अंशदानाची प्रारंभिक शिल्लक;

(दोन) वर्षावधीतील कर्मचाऱ्याची एकूण वर्गणी (यात ऐच्छिक वर्गणी व काढलेल्या रकमांची परतफेड यांचा समावेश असेल) तसेच त्याच कालावधीतील मंडळाचे एकूण अंशदान.

(तीन) वर्षात मिळालेले व्याज.

(चार) कर्मचाऱ्याने दिलेल्या वर्गणीतून त्या वर्षात त्याला काढण्यास परवानगी देण्यात आलेली रक्कम;

(पाच) त्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी असलेली कर्मचाऱ्याच्या वर्गणीची तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत

मंडळाच्या अंशदानाची अखेरची शिल्लक;

**(घ)** वर्गणीदारांनी आपल्या वार्षिक विवरणपत्रांच्या अचूकपणाची खात्री करून घ्यावी व त्यात कोणतीही चूक आढळून आल्यास ती चूक विवरणपत्र मिळाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत सचिवाच्या निदर्शनास आणण्यात यावी.

एखाद्या सदस्याने आपल्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्याची तपासणी करण्याची लेखी विनंती केल्यास त्याला किंवा त्याने लेखी अधिकार दिलेल्या व्यक्तीला कार्यालयीन वेळेत तसे करण्याची परवानगी सचिव देऊ शकेल.

**नियम - ११ : शर्ती व वर्गणीचे दर**

प्रत्येक कर्मचारी कामवार किंवा स्वीयेतर सेवेत असताना महिन्याला निधीत वर्गणी भरील.

**नियम - १२ :**

(क) वर्गणीचे वर्गणीदाराच्या वित्तलब्धिच्या X(१२) टक्के इतके असेल.

**ऐच्छिक वर्गणी**

(ख) वर्गणीदाराला, विहित केलेल्या वर्गणीच्या प्रमाणाव्यतिरिक्त जादा ऐच्छिक वर्गणी देता येईल आणि संवितरण अधिकाऱ्यास आगाऊ लेखी सूचना देऊन प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला फक्त एकदाच अशा वर्गणीची रक्कम वाढवता येईल. ही बाब सचिवासही कळवण्ययात येईल.

(ग) विनियम १२ (ख) अनुसार संपूर्ण सेवाकाळात केवळ तीनदाच मासिक वर्गणीची रक्कम कमी करण्यास परवानगी देता येईल. परंतु, ही रक्कम कमी करण्याच्या परिणामी, वरील (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली किमान वर्गणीची रक्कम कमी होऊ नये.

(घ) वर्गणीची रक्कम पूर्ण रुपयात घेण्ययात येईल आणि त्यावरील ५० पैसे किंवा त्यापेक्षा अधिक भागासाठी नंततरचा पूर्ण रुपया धरण्ययात येईल.

(च) भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर असलेल्या वर्गणीदाराच्या बाबतीत, तो भारतात कामावर असता तर जेवढ्या वित्तलब्धीसाठी तो हक्कदार ठरला असता तेवढीच त्याची वित्तलब्धी असेल.

**नियम - १३ :**

एखाद्या वर्गणीदाराची स्वीयेतर सेवेत बदली करण्यात येईल किंवा त्याला भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर पाठवण्यात येईल तेव्हा, त्याची तशी बदली झालेली नाही किंवा त्याला प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेले नाही, असे समजून त्याला निधीचे विनियम लागू राहतील.

---

**X सुधारपत्र क्र. १४, दिनांक २६-६-१९९८ अन्वये बदल ( दि. २२ सप्टेंबर १९९७ पासुन अंमलात आले.)**

**नियम - १४ : वर्गणी वसूल करणे**

(एक) वर्गणीदारांच्या वित्तलब्धीचे वाटप त्यांना करण्यापूर्वी त्यांची वर्गणी वसूल करण्यात यावी आणि मंडळाच्या सचिवाने किंवा त्याने अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने आणि / किंवा मंडळ अन्यथा वेळोवेळी विहित करील अशा रीतीने तो महिना संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत निधीच्या विश्वस्तांकडे देण्यात यावी आणि असे करण्यात कसूर झाल्यास त्याबद्दल वर्गणीदारांना प्रत्येक वर्षी ज्या दराने व्याज दिले जाते त्यापेक्षा ०.२५ टक्के एवढे अधिक व्याज या विलंबाबद्दल त्यांना देय असेल. (भविष्य-निर्वाह निधीच्या विश्वस्तांना ही रक्कम देण्यास होणाऱ्या विलंबाबद्दल द्यावयाचे हे व्याज मंजूर करण्याचा विनामर्याद आधिकार (मासीक आणि वेळोवेळी) भ. नि. निधी शाखेचा सह मु. ले. अ./ उप मु. ले. अ. यांस असेल.)

(दोन) वर्गणीदाराची वित्तलब्धी कोणत्याही अन्य ठिकाणाहून काढण्यात येत असेल तेव्हा, तो आपली मासिक वर्गणी / देय रक्कम सचिवाकडे पाठवील आणि सचिव ती निधीच्या विश्वस्तांकडे सुपूर्द करील.

(तीन) या विनियमांनुसार, कोणत्याही कर्मचाऱ्याच्या वित्तलब्धीतून मंडळाच्या वतीने संवितरण अधिकाऱ्याकडून कापून घेतली जाणारीकोणतीही रक्कम ती विश्ववस्तांकडे सुपूर्द करण्यासाठी मंडळाकडे सोपवण्यात आलेली रक्कम आहे, असे मानण्यात येईल.

**टीप :** दररोज, आठवड्याला किंवा पंधरवडयाला वेतन दिल्या जाणाऱ्या सदस्याच्या वेतनातून त्या त्यावेळी कापून घेण्यात आलेल्या वर्गणीच्या रकमांची बेरीज करून ती एकत्रित मासिक वसुली म्हणून दर्शवण्यात येईल.

**नियम - १५ : मंडळाचे अंशदान**

(एक) मंडळ दरमहा प्रत्येक वर्गणीदाराच्या खात्यामध्ये अंशदान करील आणि वर्गणीदाराकडून मिळालेल्या वर्गणीबरोबरच अशा रक्कमा विश्वस्तांकडे सुपूर्द करण्याची व्यवस्था असेल.X(अंशदायी भविष्य निर्वाहनिधी रक्कम भविष्य निर्वाह निधीच्या विश्वस्ताकडे भरणा मंजूर करणेचा विनामर्याद अधिकार (मासीक आणि वेळोवेळी) भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळाचे सचिव / उपमुख्य लेखा अधिकारी यांस असेल.) **अशा प्रकारे मिळालेली रक्कम प्रत्येक महिन्याला त्या त्या वर्गणीदाराच्या वैयक्तिक खात्यावर तात्काळ जमा करण्यात येईल.**

परंतु, कोणत्याही महिन्यात वर्गणीदार नोकरी सोडील किंवा मरण पावेल त्यावाबतीत, मागील महिना संपल्याची तारीख व प्रकरणपरत्वे त्याने नोकरी सोडल्याची किंवा तो मरण पावल्याची तारीख यामधील कालावधीसाठी त्याच्या खात्यात अंशदानाची रक्कम जमा करण्यात येईल.

(दोन) मंडळाच्या अंशदानाचे प्रमाण हे वित्तलब्धीच्या XX(१२) टक्के किंवा वर्गणीदाराकडून मिळालेल्या रक्कम, यापैकी जी रक्कम कमी असेल, तेवढे असेल. परंतु या गोष्टीला प्रतिकूल असा

---

**X सुधारपत्र क्र. ८, दिनांक ९-९-१९९३ अन्वये समाविष्ट.**

**XX सुधारपत्र क्र. १४, दिनांक २६-६-१९९८ अन्वये बदल ( दि. २२ सप्टेंबर १९९७ पासुन अंमलात आले.)**

कोणताही करार करण्यात आला असला तरी ही मंडळ आपले अंसदान कर्मचाऱ्याच्या वित्तलब्धीतून कापून घेणार नाही किंवा अन्यथा त्याच्याकडून ते वसूल करणार नाही.

टीप : "यापैकी जी रक्कम कमी असेल" या मजकुराचा अर्थ, कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वित्तलब्धीच्या X१२ टक्क्यांपेक्षा कमी दराने वर्गणी देण्याची सवलत आहे असा घेण्यात येऊ नये. एखाद्या कर्मचारी अवैतनिक असाधारण रजेवर असेल व त्या कालावधीत त्या कर्मचाऱ्याची वर्गणी वसूल करणे शक्य नसेल यासारख्या आकस्मिक अडचणींतून मार्ग काढता यावा या उद्देशाने वरील मजकुराची योजना केलेली आहे.

(तीन) भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, तो भारतात कामावर असताना त्याला जी वित्तलब्धी मिळाली असती ती वित्तलब्धी, या विनियमाच्या प्रयोजनार्थ, त्याला कामावर असताना मिळणारी वित्तलब्धी आहे, असे मानण्यात येईल.

(चार) मंडलाच्या "स्वीयेतर सेवेतील" कर्मचाऱ्याच्या बाबतीत, मंडळाकडे त्याची वर्गणी जशी व जेव्हा येईल त्याप्रमाणे, वरील विनियम १५ (१) अनुसार त्याच्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यात अंशदान जमा करण्यात येईल. असे अंशदान व असल्यास, त्यावरील देय व्याज, संबंधित "स्वीयेतर नियोक्त्याकडून" वसूल करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करण्याची जबाबदारी मंडळावर असेल.

**नियम - १६ : व्याज**

**(एक)** निधीचे रोखे व इतर मत्ता यांपासून मिळणारे उत्पन्न योग्य प्रकारे लक्षात घेऊन, विश्वस्तमंडळ वेळोवेळी विहित करील अशा दराने व्याजाची रक्कम वर्गणीदाराच्या खात्यात जमा करण्यात येईल.

**(दोन)** प्रत्येक वर्षी दिनांक ३१ मार्चपासून खाली दिलेल्या रीतीने व्याजाची रक्कम खात्यात जमा करण्यात येईल;

(१) मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेतून चालू वर्षी काढण्यात आलेली कोणतीही रक्कम वजा जाता उरलेल्या रकमेवर बारा महिन्याचे व्याज;

(२) चालू वर्षी काढलेल्या रकमेवरील व्याज हे त्या वर्षाच्या दिनांक १ एप्रिलपासून रक्कम काढण्यात येण्यापूर्वीच्या महिन्यातील शेवटच्या तारखेपर्यंत आकारण्यात येईल;

(३) मागील वर्षाच्या ३१ मार्चनंतर वर्गणीदाराच्या खात्यात जमा करण्यात आलेल्या सर्व रकमांवर सदर रकमा त्या खात्यात भरल्याच्या तारखेपासून चालू वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत व्याज;

(४) व्याजाची एकूण रक्कम विनियम क्र. १० मध्ये दिलेल्या रीतीने जवळच्या पूर्ण रुपयात करावी.

परंतु, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम देय होईल त्याबाबतीत, या पोटविनियमान्वये

**X सुधारपत्र क्र. १४, दिनांक २६-६-१९९८ अन्वये बदल ( दि. २२ सप्टेंबर १९९७ पासुन अंमलात आले.)**

प्रकरणपरत्वे, केवळ चालू वर्षाच्या आरंभापासून किंवा रक्कम खात्यात जमा केल्याच्या तारखेपासून ही रक्कम देय होईल त्या तारखेपर्यंत सदर रकमेवर अगोदरच्या वित्तीय वर्षासाठी निश्चित करण्यात आलेल्या व्याजाच्या दराने आणि विनिमय क्र. ३४ (ग) मध्ये विहित केलेल्या रीतीने, व्याजाची रक्कम त्याच्या खात्यात जमा करण्यात येईल.

**(तीन)** या विनियमाच्या प्रयोजनास्तव, प्रकरणपरत्वे, वर्गणी मिळाल्याच्या किंवा ती वसूल करण्यात आल्याच्या महिन्याची पहिली तारीख ही रक्कम खात्यात जमा करण्यात आल्याची तारीख मानण्यात यावी- मग ती रक्कम मिळाल्याची किंवा वसूल केल्याची त्या महिन्यातील प्रत्यक्ष तारीख कोणतीही असो.

**(चार)** कर्मचाऱ्याच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेव्यतिरिक्त, विनियम क्र. ३४ (ग) मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत व विहित केलेल्या रीतीने व्याजाची रक्कम देय असेल.

**(पाच)** विनिमय क्र. २१ चा पोटविनियम (३) किंवा विनियम क्र. २३ चा पोटविनियम (४) किंवा विनियम क्र. २५ चा पोटविनियम (१) किंवा विनियम क्र. २६ चा पोटविनियम (२) अन्वये, वर्गणीदाराच्या निधीच्या खात्यात बदली करण्यात आलेल्या रकमांवरील व्याजाची, या निधीच्या पोटविनिमय (१) खाली दरवर्षीच्या विहित दराने आणि शक्य होईल तेथवर या विनियमात स्पष्ट करण्यात आलेल्या रीतीने, परिगणना करण्यात येईल.

**नियम - १७ : वर्गणीदाराला निधीतून आगाऊ रक्कम देणे :**

**(क)** वर्गणीदाराकडून विहित नमुन्यात अर्ज मिळाल्यानंतर त्याला निधीमधील त्याच्या खात्यात जमा असलेल्या **त्याच्या स्वतःच्या वर्गणीच्या** रकमेतून परतावायोग्य तात्पुरती आगाऊ रक्कम, खालील शर्तींवर देण्यात येईल.

**(ख)** अर्जदाराची आर्थिक गरज लक्षात घेता आणि खाली नमूद केलेल्या उद्देशांव्यतिरिक्त अन्य गोष्टींवर आगाऊ रक्कम खर्च होणार नाही याबाबत मंजूरी अधिकाऱ्याची (विनियम क्र.२८(क) पहा) खात्री पटणार नाही. तोपर्यंत, आगाऊ रक्कम मंजूर करण्यात येणार नाही.

(एक) वर्गणीदाराच्या किंवा (त्याच्यावर प्रत्यक्षात अवलंबित पत्नी किंवा पती, औरस मुले, सावत्र मुले, आईवडील, बहिणी किंवा अज्ञान भाऊ यांसारखा) त्याच्या कुटुंबातील सदस्याच्या दीर्घकालीन आजारपणासाठी केलेला खर्च देणे;

(दोन) वर्गणीदाराच्या किंवा त्याच्या "कुटुंबा"तील त्याच्यावर प्रत्यक्षात अवलंवून असलेल्या कोणत्याही सदस्याच्या स्वास्थ्याच्या कारणांसाठी विदेशी जाण्यासाठी लागणारा प्रवासखर्च देणे;

(तीन) खालील प्रकरणी, वर्गणीदार किंवा त्याच्या "कुटुंबा"तील त्याच्यावर प्रत्यक्षात अवलंवून असलेला कोणताही सदस्य त्यास आवश्यक त्यावेळी कराव्या लागणाऱ्या प्रवासखर्चासह, उच्च शिक्षणासाठी करावा लागणारा खर्च देणे;

(क) माध्यमिक शिक्षणानंतरचे विद्याविषयक (ॲकडेमिक), तांत्रिक, पेशाविषयक (प्रोफेशनल) किंवा व्यावसायिक पाठ्यक्रमाचे भारताबाहेरील शिक्षण आणि

(ख) माध्यमिक शिक्षणानंतरचा कोणताही वैद्यकशास्त्रातील, अभियांत्रिकी किंवा अन्य तांत्रिक किंवा विशेषीकृत भारतातील पाठ्यक्रम किंवा माध्यमिक शिक्षणापेक्षा खालच्या स्तरावरील कोणत्याही सैनिकी शाळा किंवा सैनिकी अकादमी यातील किमान तीन वर्षांचा असेल असा सैनिकी शिक्षणाचा पाठ्यक्रम.

(चार) (वर्गणीदाराच्या किंवा त्याच्यावर प्रत्यक्षात अवलंबून असलेले त्याचे मुलगे व मुली व सख्खे भाऊ व बहिणी यांच्या) विवाहासंबंधात किंवा त्याच्या धर्माप्रमाणे त्याला एक अवश्य कर्तव्य म्हणून करावे लागणारे अंत्यसंस्कार किंवा पार पाडावे लागणारे, खाली निर्दिष्ट केलेले धार्मिक विधी यासाठी वर्गणीदाराच्या दर्जाप्रमाणे उचित प्रमाणात जो बंधनकारक खर्च करावा लागतो तो देणे :-

(क) वर्गणीदाराच्या नवजात बालकाचा नामकरण विधी;

(ख) वर्गणीदाराच्या पुत्रांचा व्रतबंध समारंभ;

(ग) वर्गणीदाराच्या मुलांचा किंवा मुलींचा नवजोत समारंभ;

(घ) वर्गणीदाराच्या पुत्रांचा सुन्नत समारंभ;

(च) वर्गणीदाराच्या मुलांचा किंवा मुलींचा बाप्तिस्मा किंवा कम्युनियम समारंभ;

(छ) वर्गणीदाराच्या मात्यापित्याचे पहिले वर्षश्राद्ध;

(पाच) मंडळाच्या सेवेत असताना त्याने केलेल्या कोणत्याही अभिकथित पदीय (ऑफिशियल) गैरवर्तणुकीबद्दल न्यायालयात त्याच्यावर खटला भरण्यात आला असल्यास त्याला स्वतःच्या बचावासाठी येणारा खर्च भागवणे; आणि

(सहा) वर्गणीदार आपले कार्यालयीन कर्तव्य पार पाडीत असताना त्याने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल त्याच्यावर केलेल्या अभिकथनांच्या (ॲलेगेशन्स) संबंधात त्याने त्याच्या बाजूने सत्य स्थापित करण्यासाठी (व्हिंडिकेटिंग), शिस्त व अपीलविषयक कार्यपद्धतीअन्वये विहित केलेल्या सक्षम अधिकाऱ्याच्या आदेशानुसार त्याने दाखल केलेल्या कायदेशीर कार्यवाहीचा खर्च त्याला भागवता येणे;

(सात) चोरी किंवा जबरी चोरी, आग, चक्रीवादळ, पूर किंवा यांसारख्या अन्य अपेक्षित आपत्तीमध्ये वर्गणीदाराला तात्काळ सहाय्य देणे.

**टीप** : (क) वरील (सहा) व (सात) या प्रकरणी उपलब्ध होणारी आगाऊ रक्कम ही, **मंडळ** असे खर्च भागवण्यासाठी ज्या अन्य आगाऊ रकमा मंजूर करीत असते त्याव्यतिरिक्त असेल.

(ख) विशेष कारणांचा अपवाद करता, वर्गणीदाराची स्वतःच्या वर्गणीची पुरेशी शिल्लक त्याच्या खाती असल्यास सर्वसाधारणपणे त्याला ३ महिन्यांच्या वित्तलब्धिंपेक्षा अधिक होणार नाही इतकी आगाऊ

रक्कम मिळेल.

(ग) मागील आगाऊ रक्कम व तिच्यावरील व्याज यांची अंतिमरीत्या परतफेड झाल्यानंतर किमान तीन महिन्यांचा कालावधी लोटल्याशिवाय दुसरी आगाऊ रक्कम मंजूर करण्यात येणार नाही; परंतु वर्गणीदार स्वतःसाठी वैद्यकीय उपचार करून घेत असेल तेव्हा याबाबत अपवाद करता येईल.

(घ) सक्षम मंजुरी अधिकारी आगाऊ रक्कम देण्याची / न देण्याची कारणे लेखी नमूद करील.

परंतु असे कारण गोपनीय स्वरूपाचे असेल तर ते सचिवास स्वतः किंवा गुप्तपणे किंवा दोन्ही रीतींनी कळवण्यात यावे.

**नियम** - १७ (१) :

"क" (१) **निवासस्थान किंवा निवासासाठी जमीन खरेदी करण्यासाठी किंवा निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठी कर्मचाऱ्याने निधीमधून आगाऊ रक्कम मिळण्याकरिता अर्ज केल्यास त्याला खालील शर्तीच्या अधीन ती देता येईल.**

(एक) सक्षम अधिकाऱ्यास, कर्मचाऱ्याकडून अर्ज करण्यात आल्यानंतर, निधीत त्याच्या खाती जमा असलेल्या त्याच्या स्वतःच्या वर्गणीच्या रकमेतून, त्याचे बारा महिन्यांचे मूळ वेतन व महागाई भत्ता यांच्या एकत्रित रकमेपेक्षा अधिक होणार नाही एवढी आगाऊ रक्कम किंवा त्याच्या खात्यात जमा असलेली त्याची स्वतःची एकूण वर्गणी व त्यावरील व्याज एवढी एकत्रित रक्कम, या दोहोंपैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम निवासस्थान किंवा निवासासाठी जमीन खरेदी करण्यासाठी किंवा निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठी, मंजूर करता येईल.

परंतु, निवासासाठी जमीन खरेदी करण्याकरिता आगाऊ रक्कम मंजूर करण्यात येईल त्याबाबतीत, सहा महिन्यांचे मूळ वेतन व महागाई भत्ता यांच्या एक्तत्रित रकमेपेक्षा अधिक होणार नाही एवढी आगाऊ रक्कम किंवा त्याच्या खात्यात जमा असलेली त्याची स्वतःची एकूण वर्गणी व त्यावरील व्याज या एकत्रित रकमेपैकी अर्धी रक्कम, या दोहोंपैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम प्रारंभी आगाऊ रक्कम म्हणून देण्यात येईल आणि अशा निवासासाठी खरेदी केलेल्या जमिनीवर निवासस्थान बांधण्याच्या वेळी तो कर्मचारी उरलेली आगाऊ रक्कम मिळावी म्हणून विनंती करील त्यावेळी त्याला ती देण्यात येईल व ती रक्कम सहा महिन्यांचे मूळ वेतन व महागाई भत्ता यांची एकत्रित रक्कम किंवा **पूर्वी उचललेल्या आगाऊ रकमेच्या मंजुरीच्या वेळी त्याच्या खात्यात जमा असलेली त्याची स्वतःची एकूण वर्गणी व त्यावरील व्याज एवढी एकत्रित रक्कम**, या दोहोंपैकी जी रक्कम कमी असेल, तेवढी असेल.

आणखी असे की, अशी आगाऊ रक्कम निवासस्थानाच्या बांधकामाच्या संबंधातील असेल तेव्हा सक्षम अधिकाऱ्यास योग्य वाटेल तेवढ्या हप्त्यांमध्ये ती मंजूर करता येईल.

(दोन) कर्मचारी निधीच्या सदस्यत्वाची पाच वर्षे पूर्ण करणार नाही आणि निधीतील त्याच्या खाती जमा असलेली एकूण वर्गणी व्याजासह रुपये एक हजार किंवा त्यापेक्षा अधिक असणार नाही तोपर्यंत,

त्याला वरील पोटपरिच्छेद (१) अन्वये आगाऊ रक्कम मंजूर करण्यात येणार नाही.

(तीन) निवासस्थानाचे बांधकाम करण्यासाठी आगाऊ रक्कम मंजूर करण्यात येईल तेव्हां पहिला हप्ता घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत बांधकाम सुरू करण्यात आले पाहिजे व अंतिम हप्ता घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत ते पूर्ण झाले पाहिजे. निवासस्थान किंवा निवासासाठी जमीन खरेदी करण्यासाठी आगाऊ रक्कम घेण्यात येईल तेव्हा अशी रक्कम घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात आला पाहिजे.

(चार) खालील पोट परिच्छेद (पाच) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांचा अपवाद करून, या परिच्छेदान्वये कोणत्याही कर्मचाऱ्याला आणखी आगाऊ रक्कम अनुज्ञेय नसेल.

(पाच) खाली दिलेल्या कारणांसाठी, कर्मचाऱ्याला आणखी आगाऊ रकमेची खरोखरच गरज आहे याबद्दल खात्री पटल्यास सक्षम अधिकारी, कर्मचाऱ्याचे मूळ वेतन व महागाई भत्ता यांची एकत्रित रक्कमेच्या सहा पट किंवा निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली त्याची स्वतःची एकूण वर्गणी व त्यावरील व्याज यांची एकत्रित रक्कम, या दोहोंपैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम, आणखी आगाऊ रक्कम म्हणून मंजूर करू शकेल.

(क) पूर्वीच बांधलेल्या किंवा खरेदी केलेल्या निवासस्थानामध्ये आवश्यक ती भर घालणे; किंवा

(ख) पूर्वीच सुरू केलेल्या निवासस्थानाचे बांधकाम पूर्ण करणे.

(सहा) निवासासाठी जमीन किंवा निवासस्थान खरेदी करण्यासाठी आगाऊ रक्कम मिळावी यासाठी अर्ज करण्यात येईल त्याबाबतीत, अशी जमीन किंवा प्रकरणपरत्वे **निवासस्थान भारमुक्त असल्याशिवाय ही** आगाऊ रक्कम देण्यात येणार नाही.

(सात) या परिच्छेदान्वये देण्यात आलेली आगाऊ रक्कम, ज्या प्रयोजनासाठी ती मंजूर करण्यात आली असेल त्यासाठी प्रत्यक्षात खर्च केलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत, अशी जादा रक्कम कर्मचाऱ्याने खरेदीचा व्यवहार पूर्ण झाल्यापासून तीस दिवसांच्या आत किंवा प्रकरणपरत्वे निवासस्थानाचे बांधकाम किंवा त्यात आवश्यक ती भर घालण्यात आलेल्या भागाचे बांधकाम पूर्ण झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निधीकडे परत करावी.

(आठ) या परिच्छेदान्वये देण्यात आलेली आगाऊ रक्कम ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली होती त्या प्रयोजनासाठी न वापरता अन्य प्रयोजनासाठी वापरण्यात आली आहे किंवा आगाऊ रकमेसंबंधातील शर्ती पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत किंवा त्यासंबंदातील सर्व किंवा काही शर्ती पूर्ण होण्याची शक्यता नाही, अशी शंका घेण्यास वाव आहे किंवा वरील पोटपररिच्छेद (सात) अनुसार जादा रक्कम परत केली जाणार नाही याबाबत खात्री पटल्यास सक्षम अधिकारी अशी येणे असलेली रक्कम द. सा. द. शे. कमाल ६¼ टक्के एवढ्या व्याजासह व तो निश्चित करील तेवढ्या हप्त्यांमध्ये त्या कर्मचाऱ्याच्या वेतनातूनातून वसूल करण्यासाठी उपाययोजना करील. या वसुलीसाठी, असा प्रत्येक हप्ता कर्मचाऱ्याच्या वित्तलब्धीतून कापून घेण्याचा निदेश तो संवितरण अधिकाऱ्याला देऊ शकेल आणि असा निदेश मिळाल्यानंतर संवितरण

अधिकारी त्याप्रमाणे हप्ता कापून घेऊल. अशा प्रकारे कापून घेण्यात आलेली रक्कम वर्गणीदाराच्या खात्यात जमा करण्यात येईल.

(नऊ) या परिच्छेदान्वये देण्यात आलेल्या आगाऊ रकमेचा गैरवापर करण्यात आल्यास उक्त परिच्छेदान्वये कर्मचाऱ्याला पुन्हा आगाऊ रक्कम देण्यात येणार नाही.

(दहा) ठराविक काळानंतर घराची दुरुस्ती करण्यासाठी किंवा त्याच्या परीरक्षणासाठी (मेन्टेनन्स) आगाऊ रक्कम देण्यात येणार नाही.

**नियम** - १७ (१) :

X"क" (२) ज्या कर्मचाऱ्याचे वेतन दरमहा XX(पाच हजार) रुपयांपेक्षा अधिक नसेल असा कर्मचारी, घर खरेदी **किंवा** घरबांधणी **किंवा** जमीनखरेदी **किंवा** घर व जमीनखरेदी **किंवा** घराचे जादा बांदकाम **किंवा** त्यात मोठ्या प्रमाणात फेरबदल **किंवा** त्यातील आवश्यक त्या सुधारणा यासाठी आगाऊ रक्कम मिळण्यास पात्र असेल.

परंतु, त्यासाठी प्रकरणपरत्वे, असे घर **किंवा** जमीन **किंवा** घर व जमीन आपण भारग्रस्त (अेन्कंबर) **किंवा** परस्वाधीन (एलीनेट) करणार नाही अशी हमी कर्मचाऱ्याने विश्वस्तांना द्यावी लागेल.

वरील पोटनियमाच्या प्रयोजनास्तव, "वेतन" यामध्ये, निधीतून रक्कम काढण्याच्या वेळी कर्मचारी जे मिळण्यास पात्र असेल असे मूळ वेतन, महागाई भत्ता, प्रतिधारण भत्ता (कोणत्याही असल्यास) आणि आहारविषयक सवलतीपोटी मिळणारी रोख रक्कम यांचा समावेश असेल.

उपरिनिर्दिष्ट रक्कम काढण्यास खालील शर्ती लागू असतील;

(एक) काढावयाची रक्कम खालीलपेक्षा अधिक होणार नाही;

(क) कर्मचाऱ्याचे छत्तीस महिन्यांचे मूळ वेतन व महागाई भत्ता, **किंवा**

(ख) घरबांधणीचा **किंवा** घरखरेदीचा **किंवा** जमीन खरेदीचा **किंवा** घर व जमीन खरेदीचा प्रत्यक्ष खर्च **किंवा**

(ग) निधीतील नियोक्त्याच्या अंशदानाच्या विनिर्दिष्ट टक्केवारीसह कर्मचाऱ्याचे निधीतील अंशदान व त्यावरील व्याज;

**यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.**

**स्पष्टीकरण :**

उप खंड (ग) च्या प्रयोजनास्तव **"विनिर्दिष्ट टक्केवारी"** म्हणजे,

---

**X सुधारपत्र क्र. ३, दिनांक २-३-१९८७ अन्वये मजकूर दाखल.**

**XX सुधारपत्र क्र. ७ दिनांक २९-१०-१९९२ अन्वये सुधारीत (दिनांक ३-४-१९९२ पासून लागू)**

(१) कर्मचाऱ्याचा निधीच्या सदस्यत्वाचा कालावधी पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असेल परंतु दहा वर्षांपेक्षा कमी असेल तर रक्कम प्रदान करण्यास परवानगी देण्यात आल्याच्या तारखेला निधीतील संचित रकमेतील नियोक्त्याच्या अंशदानापैकी ७५ टक्के रक्कम;

(२) कर्मचाऱ्याचा निधीच्या सदस्यत्वाचा कालावधी दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असेल परंतु पंधरा वर्षांपेक्षा कमी असेल तर अशा अंशदानापैकी ८५ टक्के रक्कम;

(३) कर्मचाऱ्याचा निधीच्या सदस्यत्वाचा कालावधी पंधरा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा अंशदानाची १०० टक्के रक्कम;

(दोन) कर्मचाऱ्याच्या सेवेची पाच वर्षे पूर्ण झालेली असली पाहिजेत किंवा आगामी दहा वर्षांत तो सेवानिवृत्त होणार असला पाहिजे.

(तीन) घर आणि / किंवा जमीन भारमुक्त असेल तरच केवळ रक्कम काढण्यास परवानगी देण्यात येईल.

(चार) ज्या संयुक्त मालमत्तेची किंवा इमारतीची किंवा घराची किंवा जमिनीची मालकी विभागलेली असेल त्याचा / तिचा हिस्सा खरेदी करण्याकरिता रक्कम काढण्यास परवानगी असणार नाही. परंतु पती व पत्नी यांच्याकडे संयुक्तपणे जमिनीची मालकी असल्यास त्याचा अपवाद करण्यात येईल.

(पाच) घरबांधणीसाठी रक्कम काढण्यात येणार असेल त्याबाबतीत, निधीच्या विश्वस्तांना योग्य वाटेल एवढ्या (चारपेक्षा अधिक न होणाऱ्या) हप्त्यांत रक्कम काढण्यास मंजुरी देता येईल.

(सहा) घरबांधणीसाठी रक्कम काढावयाची असेल तेव्हा, पहिला हप्ता घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत बांधकाम सुरू करण्यात आले पाहिजे व अंतिम हप्ता घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत ते पूर्ण झाले पाहिजे.

(सात) घर आणि / किंवा घरासाठी जमीन घेण्याच्या प्रयोजनास्तव रक्कम काढण्यात येईल तेव्हां, रक्कम घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत अशी खरेदी करण्यात आली पाहिजे.

(आठ) प्रकरणपरत्वे, घरखरेदी किंवा घरबांधणी आणि / किंवा जमीनखरेदी यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चापेक्षा अधिक रक्कम काढण्यात आली असेल किंवा ती रक्कम ज्या प्रेयाजनासाठी काढण्यात आली असेल त्या प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यात आला नसेल त्याबाबतीत, प्रकरणपरत्वे, अशी जादा किंवा पूर्ण रक्कम, ती काढण्यात येईल त्या महिन्यापासून विहित दराने आकारण्यात आलेल्या तिच्यावरील व्याजासह विश्वस्तांकडे परत करण्यात यावी.

"क" (३) ज्या कर्मचाऱ्याचे वेतन दरमहा X(पाच हजार) रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा कर्मचाऱ्याला, त्याच्या मालकीच्या किंवा तो/ती व पती/पत्नी यांची सहमालकी असलेल्या घरात जादा बांधकाम, किंवा मोठ्या प्रमाणात फेरबदल किंवा सुधारणा करण्यासाठी त्याचे बारा महिन्यांचे मूळ वेतन व महागाई भत्ता

---

**X सुधारपत्रर क्र. ७ दिनांक २९-१०-१९९२ अन्वये सुधारित (दिनांक ३-४-१९९२ पासून लागू)**

एवढी किंवा कर्मचाऱ्यांच्या अंशदानाचा हिस्सा व त्यावरील व्याज किंवा त्याच्या खाती जमा असलेली रक्कम यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम एका हप्त्यात मंजूर करता येईल.

परंतु, घरखरेदीच्या किंवा घरबांधणी पूर्ण झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षानंतरच केवळ अशी रक्कम काढता येईल.

आणखी असे की, रक्कम ज्या प्रयोजनासाठी काढण्ययात आली असेल त्या प्रयोजनासाठी संपूर्ण रकमेचा किंवा तिच्या काही भागाचा वापर करण्यात आला नसेल त्याबाबतीत, प्रकरणपरत्वे, अशी जादा उरलेली रक्कम किंवा संपूर्ण रक्कम, ती काढण्यात येईल त्या महिन्यापासून विहित दराने आकारण्यात आलेल्या तिच्यावरील व्याजासह, एकरकमी विश्वस्तांकडे परत करण्यात येईल आणि अशी परत करण्यात आलेली रक्कम वर्गणीदाराच्या निधीतील खात्यात जमा करण्यात येईल.

**नियम** - १७ : (१)

"ख" **कोणत्याही राज्य शासनाकडून गृहनिर्माण मंडळाकडून किंवा सहकारी संस्था अधिनियमान्वये नोंदण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून (औद्योगिक कामगारांसाठी अर्थसहाय्यत गृहनिर्माण योजनेखाली किंवा अन्य प्रकारच्या योजनांखाली) बांधण्यात आलेल्या किंवा बांधण्यात यावयाच्या गाळ्यांचे वाटप व्हावे किंवा संस्थांनी, विश्वस्तव्यवस्थांनी, स्थानिक संस्थांनी किंवा गृहनिर्माण वित्त महामंडळांनी बांधलेल्या किंवा बांधण्यात यावयाच्या गाळ्यांचे वाटप व्हावे यासाठी, निधीतून आगाऊ रक्कम मिळणे.**

(१) कोणत्याही राज्य शासनाकडून, गृहनिर्माण मंडळाकडून किंवा सहकारी संस्था अधिनियम, १९१२ अन्वये नोंदण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून (औद्योगिक कामगारांसाठी अर्थसहाय्यत गृहनिर्माण योजनेखाली किंवा एकतर मालकी तत्त्वावर किंवा भाडे खरेदी योजनेखाली) बांधण्यात आलेल्या किंवा बांधण्यात यावयाच्या गाळ्यांचे वाटप व्हावे किंवा संस्थांनी विश्वस्त व्यवस्थांनी, स्थानिक संस्थांनी किंवा गृहनिर्माण महामंडळांनी बांधलेल्या किंवा बांधण्यात यावयाच्या गाळ्यांचे वाटप व्हावे यासाठी, ज्या सदस्याने निधीच्या सदस्यत्वाची पाच वर्षे पूर्ण केली असतील आणि निधीतील त्याच्या खाती त्याची स्वतःची वर्गणी व त्यावरील व्याज मिळून किमान सातशे पन्नास रुपये जमा असतील त्याला भविष्यनिर्वाह निधीतून आगाऊ रक्कम मंजूर करता येईल किंवा त्याचे बारा महिन्यांचे मूळ वेतन व महागाई भत्ता यापेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम किंवा निधीत जमा असलेली त्याची स्वतःची वर्गणी व त्यावरील व्याज किंवा खर्चातील त्याच्या हिश्याची रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम, राज्य शासन, गृहनिर्माण मंडळ, तो सदस्य असेल ती सहकारी गृहनिर्माण संस्था, इत्यादी, याकडे सक्षम अधिकारी मान्यता देईल अशा रीतीने भरणा करण्यासाठी त्या सक्षम अधिकाऱ्यास तो सदस्य अधिकारपत्र देऊ शकेल.

(२) सक्षम अधिकारी, त्याने मान्यता दिलेल्या रीतीने अधिकारपत्र देण्यात आले आहे याची खात्री करून घेतल्यनंतर, प्रकरणपरत्वे राज्य शासन, गृहनिर्माण मंडळ किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था, इत्यादी, याकडे अशा रकमेचा भरणा करील.

(३) कर्मचाऱ्याला उक्त योजनेखाली गाळ्याचे वाटप झाले नाही किंवा त्या योजनेखाली त्याला झालेले गाळ्याचे वाटप त्याने रद्द करून घेतले तर अशा वेळी, या परिच्छेदान्वये राज्य शासन, गृहनिर्माण मंडळ किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था, इत्यादी, याकडे भरणा केलेली रक्कम, ती परत मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत निधीत परत भरण्यात पात्र असेल. अशी परत केलेली कोमतीही रक्कम वर्गणीदाराच्या खात्यात जमा करण्यात येईल.

(४) या परिच्छेदान्वये कर्मचाऱ्याला दुसरी आगाऊ रक्कम अनुज्ञेय नसेल.

(५) "सहकारी संस्था" म्हणजे, सहकारी संस्था, अधिनियम, १९१२ (१९१२ चा दुसरा) अन्वये किंवा सहकारी संस्थांच्या संबंधात कोणत्याही क्षेत्रामध्ये त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्याखाली नोंदवण्यात आलेली किंवा नोंदल्याचे मानण्यात आलेली संस्था.

**टीप** : वरील विनियम क्र. १७ (१) क आणि ख याअन्वये निवासस्थान किंवा निवासासाठी जमीन खरेदी करण्यात आगाऊ रक्कम मंजूर करण्यात आली असेल तेव्हां, तिचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर कोणत्याही वेळी आणि अंतिम हप्ता मिळाल्यापासून **पाच वर्षांच्या कालावधीत**, प्रकरणपरत्वे निवासस्थान किंवा निवासासाठी खरेदी केलेली जमीन तो सदस्य विकणार नाही.

"ग" **निधीतील आगाऊ रक्कम ना-परतावायोग्य असणे :**

अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, पोटनियम "क" आणि "ख" याअन्वये दिलेली आगाऊ रक्कम ना-परतावायोग्य असेल. तथापि, वर्गणीदाराने तसा विकल्प दिल्यास ती परतावायोग्य असेल व ती परत करण्याच्या हप्त्यांची **कमाल संख्या ३६ असेल..**

"घ" कर्मचाऱ्याच्या निधीच्या सदस्यत्वाच्या कालावधीची गणना करताना (मंडळाच्या किंवा अन्य आस्थापनेच्या सेवेत असतानाच्या त्यांच्या खंडित सेवेचा अवधी वगळता), प्रकरणपरत्वे, मुंबई राज्य विद्युत मंडळामध्ये योग्य रीतीने सामावून घेण्यात आलेल्या पूर्वीच्या मुंबई विद्युत ग्रिड विभागात, सौराष्ट्र आणि मध्यप्रदेश विद्युत मंडळांमध्ये तसेच कच्छ व मराठवाडा येथील विद्युत विभागांमध्ये केलेली सेवा त्याचप्रमाणे अंशदायी भविष्यनिर्वाह निधी योजना, १९५२ अन्वये मान्यता देण्यात आलेली अशी पूर्वी केलेली कोणतीही सेवा यासह, कर्मचाऱ्याने केलेली एकूण सेवा हिशेबात घेण्यात येईल.

परंतु, अशा कालावधीत भविष्यनिर्वाह निधीतील रक्कम काढून घेऊन त्याने त्याचे निधीचे सदस्यत्व संपविलेले नसले पाहिजेत.

"च" **आगाऊ रक्कम देण्यावरील निर्बंध :**

वर्गणीदाराला एकतर पोटनियम "क" किंवा पोटनियम "ख" अन्वये आगाऊ रक्कम देण्यात यावी, **दोन्ही पोटनियमांन्वये देण्यात येऊ नये.**

**सक्षम अधिकारी :**

(एक) **भविष्य निर्वाह निधीच्या विश्वस्तमंडळाचे सचिव आणि त्यांच्या अनुपस्थितीत भ.नि.नि. शाखेचे उपमुख्य लेखाधिकारी.** **X रु. १,००,०००/- पर्यंत.**

(दोन) **विश्वस्त मंडळाचा अध्यक्ष** **X रु. १,००,०००/- पेक्षा अधिक.**

**नियम - १८**

(१) मंजुरी अधिकारी निदेश देईल तेवढ्या समान मासिक हप्त्यांमध्ये आगाऊ रक्कम वर्गणीदाराकडून वसूल करण्यात येईल. परंतु, अशा हप्त्यांची संख्या, वर्गणीदाराची तशी इच्छा असल्याशिवाय १२ पेक्षा कमी नसेल आणि कोणत्याही परिस्थितीत ती संख्या ३६ पेक्षा अधिक नसेल. वर्गणीदाराची तशी इच्छा असल्यास, मंजुरी अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने, त्याने निदेश दिलेल्यापेक्षा कमी हप्त्यांत तो आगाऊ रकमेची परतफेड करू शकेल. प्रत्येक हप्त्याची रक्कम पूर्ण रुपयात असेल आणि हप्त्यांची रक्कम अशी निश्चित करता यावी यासाठी आवश्यक वाटल्यास आगाऊ रक्कम तेवढी वाढवता किंवा कमी करता येईल.

(२) वर्गणीच्या वसुलीच्या संबंधातील विनियम क्र. १४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने वसुली करण्यात येईल व ती वसुली, आगाऊ रक्कम ज्या महिन्यात घेतली असेल त्यानंतर येणाऱ्या महिन्यापासून सुरू करण्यात येईल.

(३) वर्गणीदाराला एकापेक्षा अधिक आगाऊ रकमा देण्यात आल्या असतील तेव्हा वसुलीच्या प्रयोजनास्तव अशी प्रत्येक आगाऊ रक्कम स्वतंत्र मानण्यात यावी.

(४) (क) घेतलेल्या आगाऊ रकमेची पूर्णपणे परतफेड करण्यात आल्यानंतर त्या रकमेवर द. सा. द. से. ४ टक्के दराने किंवा ज्यावर्षी आगाऊ रक्कम घेण्यात आली असेल त्या वर्षी सदस्याच्या निधीच्या खात्यातील शिल्लक रकमेवर ज्या दराने व्याज देण्यात येईल त्यापेक्षा १ टक्के अधिक दराने, यापैकी जो दर अधिक असेल त्या दराने, व्याज आकारण्यात येईल (व ते वर्गणीदाराच्या खात्यात जमा करण्यात येईल). तसेच, अशी रक्कम घेतल्यापासून तिची परतफेड पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी, आगाऊ रक्कम जसजशी कमी होत जाईल त्याप्रमाणे उरणाऱ्या आगाऊ रकमेवर व्याज आकारण्यात येईल.

(ख) घेतलेल्या आगाऊ रकमेची पूर्ण परतफेड करण्यात येईल त्या महिन्यानंतरच्या महिन्यात साधारणपणे एकाच हप्त्यात व्याज वसूल करण्यात येईल; परंतु खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी २० महिन्यांपेक्षा अधिक होत असेल तर, वर्गणीदाराची तशी इच्छा असल्यास, हे व्याज दोन समान हप्त्यांत वसूल करण्यात येईल. वसुलीची रीत पोटविनिमय (२) मध्ये दिल्याप्रमाणे असेल. विनियम क्र. १० (क) मध्ये दिल्याप्रमाणे परतफेडीची रक्कम पूर्ण रुपयात असेल.

(५) एखाद्या वर्गणीदाराला आगाऊ रक्कम मंजूर करण्यात येऊन ती त्याने घेतल्यानंतर त्या रकमेची परतफेड होण्याअगोदर ती त्याला नाकारण्यात आली तर, ती पूर्ण रक्कम किंवा उर्वरित रक्कम,

---

**X सुधारपत्र क्र. ११ दिनांक ७-८-१९९५ अन्वये सुधारित.**

विनियम क्र. १६ मध्ये दिलेल्या दराने त्यावरील व्याजासह वर्गणीदार तात्काळ परत करील आणि वर्गणीदाराने तसे केले नाही तर, सक्षम अधिकारी, त्या वर्गणीदाराच्या वित्तलब्धीतून एकरकमी किंवा विनियम क्र. १७ च्या खंड (क) व (ख) अन्वये, ज्यासाठी विशेष कारणे आवश्यक असतात अशी आगाऊ रक्कम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याने तसा निदेश दिला तर, कमाल बारा हप्त्यांमध्ये कापून घेण्याचा आदेश देईल.

(६) निधीतील आगाऊ रक्कम ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली त्यासाठी तिचा वापर न करता अन्य प्रयोजनासाठी वापर करण्यात आला याबाबत खात्री पटल्यास सक्षम अधिकाऱ्यास, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने, शिल्लक आगाऊ रक्कम, निधीला लागू असलेल्या दराने व्याजासह वर्गणीदाराकडून वसूल करता येईल व त्याशिवाय त्या वर्गणीदाराविरुद्ध अपकृत्याबद्दल शिस्तभंगाची कार्यवाही सुद्धा करता येईल.

(७) या विनियमान्वये वर्गणीदाराकडून जी रक्कम वसूल करण्यात येईल ती निधीतील त्याच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

(८) **(निधीतून) काढण्यात आलेली परंतु परत न केलेली रक्कम उत्पन्न मानण्यात यावे :**

या विनियमान्वये हप्त्यांची परतफेड करण्यात कसूर होईल किंवा ज्या प्रयोजनासाठी आगाऊ रक्कम घेण्यात आली त्यासाठी तिचा वापर करण्यात आलेला नसेल अशा प्रकरणी, सक्षम अधिकाऱ्यास आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार काढण्यात आलेली किंवा अदत्त (आऊटस्टेंडिंग) रक्कम, कर्मचाऱ्याने ज्या वर्षी रक्कम भरण्यात कसूर केली असेल त्या वर्षाच्या किंवा ज्या प्रयोजनासाठी रक्कम काढण्यात आली त्या प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यात आलेला नाही असा अंतिमरीत्या निर्णय घेण्यात येईल त्या वर्षाच्या त्याच्या एकूण उत्पन्नात ती रक्कम मिळवण्यात यावी असा आदेश देता येईल आणि त्यानुसार वर्गणीदार आयकर भरण्यास पात्र ठरेल.

**नियम - १९ : विमापत्रांची प्रदाने**

विनियम क्र. २१ ते २७ यात अंतर्भूत असलेल्या शर्तींच्या अधीन-

(क) वर्गणीदाराने विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर, निधीतील त्याच्या स्वतःच्या वर्गणीतून विम्याचा हप्ता भरण्यासाठी त्याला ना परतावा आगाऊ रक्कम देण्यात येईल. तथापि, वर्गणीदाराला निधीची आपली वर्गणी प्रत्येक महिन्याला द्यावी लागेल.

(ख) वर्गणीदाराला,

एक) विमापत्राची प्रदोने देणे;

दोन) एक प्रदान (सिंगल पेमेंट) विमापत्राची खरेदी आणि

तीन) विम्याच्या एका हप्त्याचे प्रदान यासाठी निधीतील त्याच्या खात्यात जमा असलेली त्याची स्वतःची वर्गणी व त्यावरील व्याज एवढी रक्कम काढता येईल.

परंतु, . . . . .

(१) प्रस्तावित विमापत्राच्या संबंधातील तपशील सचिवास सादर करण्यात आणि सचिवाकडून तो योग्य असल्याचा स्वीकार करण्यात येणार नाही तोपर्यंत रक्कम काढण्यात येणार नाही, किंवा.

(२) रक्कम काढण्यापूर्वी बारा महिने अगोदर खरेदी केलेल्या किंवा प्रभावी झालेल्या विमापत्राचे कोमतेही प्रदान देण्यासाठी रक्कम काढण्यात येणार नाही, किंवा.

(३) रक्कम काढल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत प्रत्यक्ष देय होणाऱ्या विम्याच्या हप्त्यापेक्षा अधिक रक्कम काढण्यात येणार नाही.

आणखी असे की,

(एक) शैक्षणिक सावधि विमापत्राचे (एज्युकेशनल इन्डाउमेंट पॉलिसी) प्रदान देता येणार नाही, आणि

(दोन) एखाद्या विमापत्राच्या रकमेचा काही भाग किंवा त्या विमापत्राची पूर्ण रक्कम वर्गणीदाराचे नियत सेवानिवृत्तीचे वय पूर्ण होण्याअगोदर त्याला मिळणार असेल अशा विमापत्राची प्रदाने देण्यासाठी किंवा असे विमापत्र खरेदी करण्यासाठी रक्कम काढता येणार नाही.

(ग) खंड (ख) अन्वये काढण्यात येणारी कोणतीही रक्कम विनियम १० (क) मध्ये दिलेल्या रीतीने केवळ जवळच्या रुपयात पूर्ण करून देण्यात येईल.

(मूळ विनिमय क्र. २० (१ व २) आणि क्र. २१ (१) वगळण्यात आले.)

**नियम - २१ :**

(२) विनियम क्र. १९ च्या खंड (ख) अन्वये कोमतीही रक्कम काढण्याची वर्गणीदाराची इच्छा असेल त्याबाबतीत तो-

(क) रक्कम काढण्याचे कारण सचिवास पत्राद्वारे कळवील.

(ख) सचिवाबरोबर रक्कम काढण्याची व्यवस्था करील आणि

(ग) विनियम १९ च्या खंड (ख) यात विनिर्दिष्टय केलेल्या प्रयोजनांसाठी निधीतून काढलेल्या रकमेचा योग्य प्रकारे वापर करण्यात आला आहे याबाबत सचिवाची खात्री पटवून देण्यासाठी, सचिव विहित करील तेवढ्या कालावधीत, पावत्या किंवा पावत्यांच्या प्रमाणित प्रती पाठवील.

(३) पोटविनियम (२) च्या खंड (ग) अन्वये आवश्यक असणाऱ्या रीतीने सक्षम अधिकाऱ्याची खात्री पटवून देण्यात आली नसेल तर तो सक्षम अधिकारी, काढण्यात आलेली कोणतीही आगाऊ रक्कम व विनियम १६ मध्ये दिलेल्या दराने त्यावरील व्याज वर्गणीदाराच्या वित्तलब्धीतून वसूल करण्याचा व निधीतील त्याच्या खान्यात ती रक्कम जमा करण्याचा आदेश देईल.

**नियम - २२ :**

(१) वर्गणीदाराला विम्याचा हप्ता भरणे शक्य व्हावे यासाठी या विनियमांच्या अनुरोधाने मंडळ आगाऊ रक्कम देईल. तथापि, हे विमापत्र चालू राहील हे पाहण्याची जबाबदारी वर्गणीदारावर राहील.

(२) विमापत्र कोणत्या प्रकारचे असावे याला महत्त्व नाही. परंतु, वर्गणीदाराने घेतलेले विमापत्र त्याच्या स्वतःच्या नावे घेतलेले आणि (ते विमापत्र त्याची पत्नी किंवा त्याची पत्नी व मुले किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही लाभासाठी आहे असे सकृद्दर्शनी व्यक्त होत असेल, त्याव्यतिरिक्त) वर्गणीदारास कायदशीरपणे स्वतःच सक्षम अधिकाऱ्याकडे अभिहस्तांकित (असाईन) करता येईल, असे आयुर्विमापत्र असेल.

**स्पष्टीकरण - १ :** वर्गणीदार व त्याची पत्नी यांचे संयुक्त आयुर्विमापत्र हे, या पोटविनियमाच्या प्रयोजनास्तव, वर्गणीदाराचे स्वतःचे आयुर्विमापत्र आहे, असे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण - २ :** वर्गणीदाराच्या पत्नीकडे अभिहस्तांकित केलेले विमापत्र, समुचित अभिहस्तांकनाद्वारे, एक तर ते प्रथमतः वर्गणीदाराकडे किंवा वर्गणीदार व त्याची पत्नी या दोघांकडे पुन्हा अभिहस्तांकित करण्यात आले नसेल तर, स्वीकारण्यात येणार नाही.

(३) वर्गणीदाराची पत्नी अथवा त्याची पत्नी व मुले किंवा त्यांच्यापैकी कोणीही या व्यतिरिक्त अन्य कोणाही लाभाधिखाऱ्यासाठी विमापत्र घेता येणार नाही.

**नियम - २३ :**

(१) विमापत्र, निधीतून आगाऊ रक्कम काढण्यात आल्यापासून सहा महिन्यांच्या आत किंवा एखाद्या विमा कंपनीचे मुख्यालय भारताबाहेर असेल त्या प्रकरणी, कच्ची पावती सादर केल्यानंतर सक्षम अधिकाऱ्याचे समाधान झाल्यास त्याला ठरवून देता येईल, अशा आणखी कालावधीच्या आत.

(क) ते (त्याची पत्नी किंवा त्याची पत्नी व मुले किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही लाभासाठी आहे, असे सकृतदर्शनी व्यक्त होत असेल त्याव्यतिरिक्त), विनियम क्र. २५ ते २७ अन्वये निधीकडे देय होऊ शकेल अशा कोणत्याही रकमेच्या प्रदानासाठी प्रतिभूती म्हणून, सचिवाकडे अभिहस्तांकित करण्यात व त्याच्या सुपूर्द करण्यात येईल. सचिवाकडे करावयाचे विमापत्राचे अभिहस्तांकन हे, ते वर्गणीदाराच्या नावे केलेले आयुर्विमापत्र असेल किंवा वर्गणीदार व त्याची पत्नी यांच्या नावे केलेले संयुक्त आयुर्विमा पत्र असेल किंवा पूर्वी ते विमापत्र वर्गणीदाराच्या पत्नीकडे अभिहस्तांकित करण्यात आलेले असेल त्याप्रमाणे त्याला नमुना क्र. ५, नमुना क्र. ६ किंवा नमुना क्र. ७ जोडून बिमापत्र पृष्ठांकित केल्यानंतर, करण्यात येईल.

(ख) ते विमापत्र वर्गणीदाराची पत्नी किंवा त्याची पत्नी व मुले किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही लाभासाठी आहे असे सकृदर्शनी व्यक्त होत असेल तर, ते सचिवाच्या सुपूर्द करण्यात येईल.

(२) विमापत्राचे यापूर्वी अभिहस्तांकन झालेले नाही याबाबत, शक्य होईल त्या प्रकरणी, विमा कंपनीला संदर्भपत्र पाठवून सचिव त्याची खात्री पटवून घेईल.

(३) निधीतून हप्ते भरण्याच्या प्रयोजनास्तव सचिवाकडून विमापत्राचा एकदा स्वीकार करण्यात आल्यानंतर सचिवाच्या संमती शिवाय त्याच्या अटींमध्ये फेरबदल करण्यात येणार नाही किंवा त्याच्या बदली नवीन विमापत्र घेण्यात येणार नाही आणि अशा फेरबदलाचा किंवा नवीन विमापत्राचा तपशील सचिवाला कळवण्यात येईल.

(४) विमापत्र अभिहस्तांकित किंवा सुपूर्द करण्यात आले नाही किंवा उक्त सहा महिन्यांच्या आत किंवा पोटविनियम (१) अन्वये सक्षम अधिकाऱ्याला ठरवून देता येईल अशा आणखी कालावधीच्या आत ते सुपूर्द करण्यात आले नाही तर वर्गणीदाराला, विमापत्राच्या संबंधात निधीतून काढलेली कोणतीही रक्कम विनियम क्र. १६ मध्ये विहित केलेल्या दराने त्यावरील व्याजाच्या रकमेसह तात्काळ निधीत भरावी लागेल किंवा तसे करण्यास त्याने कसूर केल्यास, विनियम क्र. १७ च्या खंड (ख) अन्वये जी आगाऊ रक्कम देण्यासाठी विशेष कारणांची आवश्यकता असते ती आगाऊ रक्कम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यास ठरवून देता येतील अशा हप्त्यांमध्ये किंवा अन्य प्रकारे, वर्गणीदाराच्या वित्तलब्धीतून रक्कम कापून घेऊन ती वसूल करण्यासाठी सक्षम अधिकारी आदेश देईल.

(५) वर्गणीदार विमापत्राच्या अभिहस्तांकनाची नोटीस विमा कंपनीला पाठवील आणि ती विमा कंपनीला मिळाल्याची पावती असे अभिहस्तांकन झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत सचिवाला पाठवील.

**नियम - २४ :**

विमानपत्राची मुदत चालू असताना, त्या विमापत्रातील अटींच्या अनुसार त्यावरील बोनस घेणे वैकल्पिक असेल तेव्हा वर्गगणीदार तो घेणार नाही आणि त्यातील अटींमुळे त्याने बोनस स्वीकारणे भाग असेल तेव्हा तो बोनसची रक्कम तात्काळ निधीकडे जाम करील आणि त्याने तसे करण्यास कसूर केली तर, विनियम क्र. १७ अन्वये अशा वर्गणीदाराला आगाऊ रक्कम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या, विनियम क्र. २८ क यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडून निदेश देण्यात येईल त्याप्रमाणे, त्या वर्गणीदाराच्या वित्तलब्धीतून हप्त्याने किंवा अन्य प्रकारे कापून घेण्यात येईल.

**नियम - २५ :**

(१) विनियम क्र. २७ च्या पोटविनिमय (२) मध्ये तरतूद केलेल्या बाबींचा अपवाद करून, वर्गणीदार-

(क) नोकरी सोडील, किंवा

(ख) निवृतिपूर्व रजेवर गेला असेल आणि आपल्या विमापत्राचे पुन्हा अभिहस्तांकन करण्यात यावे किंवा ते परत देण्यात यावे यासाठी अर्ज करील, किंवा

(ग) रजेवर असताना सेवानिवृत्त होण्यास त्याला परवानगी देण्यात येईल किंवा पुढे नोकरी करण्यास तो शारीरिकदृष्ट्या अपात्र आहे असे सक्षम वैद्यकीय अधिकारी घोषित करील तेव्हा आपल्या

विमापत्राचे पुन्हा अभिहस्तांकन करण्यात यावे किंवा ते परत देण्यात यावे यासाठी अर्ज करील, किंवा.

(घ) विनिमय क्र. १९ चा खंड (क) व खंड (ख) चे पोटविनिमय (एक), (दोन) व (तीन) यात निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी निधीतून काढण्यात आलेली कोणतीही आगाऊ रक्कम विनियम क्र. १६ मध्ये तरतूद करण्यात आलेल्या दराने त्यावरील व्याजाच्या रकमेसह पूर्णपणे परत करील त्याबाबतीत सचिव—

(एक) विनियम क्र. २३ अन्वये विमापत्र त्याच्याकडे अभिहस्तांकित केले असेल तर, सोबत जोडलेल्या नमुना क्र. ८ मध्ये, प्रकरणपरत्वे वर्गणीदार किंवा वर्गणीदार व संयुक्त विमेदार यांच्याकडे पुन्हा अभिहस्तांकित करील आणि विमा कंपनीला पुनः अभिहस्तांकनाच्या सही करून पाठवलेल्या नोटिशीसह ते परत करील.

(दोन) विनियम क्र. २३, पोटविनिमय (१) याच्या खंड (ख) अनुसार विमापत्र त्याच्या सुपूर्द करण्यात आले असले तर ते विमापत्र परत करील.

परंतु, वर्गणीदार सेवानिवृत्तीपूर्व रजेवर गेल्यानंतर, किंवा रजेवर असताना सेवानिवृत्त होण्यास त्याला परवानगी देण्यात आल्यानंतर किंवा पुढे सेवा करण्यास तो शारीरिकदृष्ट्या अपात्र आहे, असे सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याने घोषित केल्यानंतर कामावर हजर होईल त्याबाबतीत, अशा प्रकारे पुन्हा अभिहस्तांकित किंवा परत करण्ययात आलेले कोणतेही विमापत्र, प्रकरणपरत्वे, ते परिणत (मॅच्युअर) झाले नसेल किंवा कोमत्याही प्रकारे अभिहस्तांकित, भारित (चार्ज्ड) किंवा भारग्रस्त (एन्कंबर्ड) करण्या आलेले नसेल तर, विनियम क्र. २३ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने सचिवाकडे अभहिस्तांकित करण्यात किंवा त्याच्या सुपूर्द करण्यात येईल आणि त्यानंतर दरम्यानच्या काळात त्याच्या अंशदायी भविष्ययनिर्वाह निधीतील लेख्याबाबत हिशेबपूर्ती झालेली नसेल तर, त्याच्या विमापत्राच्या संबंधात, या विनियमांतील तरतुदी, शक्य होईल तितपत लागू होतील. आणखी असे की, ते विमापत्र परिणत झाले असेल किंवा कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित, भारित किंवा भारग्रस्त करण्यात आलेले असेल तर विमापत्राचे अभिहस्तांकन व ते सुपूर्द करण्याच्या कसुरीबद्दल विनियम क्र. २३ मधील पोटविनियम (४) मधील तरतुदी त्याबाबत लागू होतील.

(२) विनियम क्र. २७ च्या पोटविनियम (२) मध्ये तरतूद केलेल्या बाबींचा अपवाद करून, वर्गणीदार नोकरी सोडण्यापूर्वी मरण पावल्यास, सचिव-

(एक) विनयम क्र. २३ अन्वये विमापत्र त्याच्याकडे अभिहस्तांकित करण्यात आलेले असेल तर, ते विमापत्र मिळण्यास जी व्यक्ती कायदेशीररीत्या पात्र असेल तिच्याकडे (सोबत जोडलेल्या) नमुना क्र. ९ मध्ये पुन्हा अभिहस्तांकित करील आणि विमा कंपनीला सही करून पाठवण्यात आलेल्या पुनः अभिहस्तांकनाच्या नोटिसीसह ते विमापत्र अशा व्यक्तीच्या हवाली करील.

(दोन) विनियम क्र. २३, पोटविनियम (१) याच्या खंड (ख) अन्वये विमापत्र त्याच्याकडे सुपूर्द करण्यात आले असले तर ते, कोणीही लाभाधिकारी असल्यास त्याच्या किंवा असा लाभाधिकारी नसेल त्याबाबतीत ते विमापत्र मिळण्यास जी व्यक्ती कायदेशीररीत्या पात्र असेल अशा व्यक्तीच्या हवाली करील.

**नियम** - २६ :

(१) विनियम क्र. २३ अन्वये सचिवाकडे अभिहस्तांतरित केलेले विमापत्र वर्गणीदार नोकरी सोडण्यापूर्वी परिणत होईल (मॅच्युअर्ड) किंवा उक्त विनियमान्वये अभिहस्तांतरित केलेले वर्गणीदार व त्याच्या पत्नीच्या नावे घेतलेले संयुक्त, आयुर्विमापत्र त्या वर्गणीदाराच्या पत्नीच्या मृत्युमुळे प्रदानयोग्य ठरले त्याबाबतीत, विनियम क्र. २७ च्या पोटविनियम (२) मध्ये तरतूद केलेल्या बाबींचा अपवाद करून, सचिव पुढीलप्रमाणे कार्यवाही करील.

(एक) विमापत्रावर मिळालेल्या बोनसच्या रकमेसह त्याची आश्वासित रक्कम, ही त्या विमापत्रासाठी निधीतून काढलेली संपूर्ण रक्कम व विनियम क्र. १६ मध्ये तरतूद केलेल्या दराने त्यावरील व्याजाची रक्कम यापेक्षा अधिक होत असेल त्याबाबतीत, सचिव प्रकरणपरत्वे, वर्गणीदार किंवा वर्गणीदार व संयुक्त विमेदार यास (सोबतच्या) नमुना क्र. १० मध्ये विमापत्र पुन्हा अभिहस्तांकित करील व ज्या वर्गणीदाराला निधीतून घेतलेली संपूर्ण किंवा काही रक्कम व त्यावरील व्याज भरावयाचे आहे त्याच्या हवाली करील आणि याबाबतीत कसूर झाल्यास विमापत्र अभिहस्तांकित व सुपूर्द न करण्याची चूक घडल्याच्या परिणामी लागू होणाऱ्या विनियम क्र. २३ च्या पोटविनिमय (४) मधील तरतूदी लागू होतील.

(दोन) विमापत्रावर मिळालेल्या बोनसच्या रकमेसह त्याची आश्वासित रक्कम ही, घेतलेली संपूर्ण रक्कम व त्यावरील व्याज यापेक्षा कमी असेल त्याबाबतीत, सचिव बोनसच्या रकमेसहित आश्वासित रक्कम प्राप्त करून घेऊल व ती निधीतील वर्गणीदाराच्या खात्यात जमा करील;

(२) विनियम क्र. २७ च्या पोटविनियम (२) मध्ये तरतूद केलेल्या बाबींचा अपवाद करून, विनिमय क्र. २३, पोटविनियम (१) चा खंड (ख) अन्वये सचिवाच्या हवाली केलेले विमापत्र वर्गणीदार नोकरी सोडण्यापूर्वी परिणत झाल्यास सचिव ते विमापत्र वर्गणीदाराच्या हवाली करील.

परंतु, सकृददर्शनी विमापत्रावर व्यक्त केल्याप्रमाणे, वर्गणीदाराच्या पत्नीचा किंवा पत्नी व मुली यांचा किंवा त्यांच्यापैकी कोणाचाही विमापत्रातील हितसंबंध संपुष्टात येत असेल तर विमापत्र परिणत झाल्यावर, वर्गणीदाराला विमा कंपनीने विमापत्राचे पैसे दिल्यास ते मिळाल्याबरोबर निधीत खालीलपैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमेचा भरणा करील.

(एक) विमापत्रासंबंधात काढण्यात आलेल्या पूर्ण रकमेचा कोणताही भाग व विनियम क्र. १६ मध्ये दिलेल्या दराने त्यावरील व्याज, किंवा.

(दोन) आश्वासित रक्कम व मिळालेली बोनसची रक्कम, आणि याबाबतीत कसूर झाल्यास, विमापत्र अधिहस्तांकित व सुपूर्द न करण्याची चूक घडल्याच्या परिणामी लागू होणाऱ्या विनियम क्र. २३ च्या पोटविनियम क्र. (४) मधील तरतुदी लागू होतील.

**नियम - २७ :**

(१) विमापत्र व्यपगत (लॅप्स्) झाले किंवा विनियम क्र. २३ अन्वये सचिवाखेरीज अन्य व्यक्तीकडे ते अभिहस्तांकित करण्यात आले किंवा भारित किंवा भारग्रस्त झाले तर, विमापत्र अभिहस्तांकित व सुपूर्द न करण्याची चूक घडल्याच्या परिणामी विनियम क्र. २३ च्या पोटविनियम (४) मधील तरतुदी लागू होतील.

(२) सचिवास . . . . .

(क) अभिहस्तांकनाची (विनियम क्र. २३ अन्वये सचिवाकडे केलेले अभिहस्तांकन वगळून) किंवा

(ख) भार किंवा भारग्रस्त केल्याची नोटीस मिळेल, किंवा

(ग) विमापत्राबाबत किंवा त्यामुळे प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेबाबत कार्यवाही करण्यास अटकाव करणारा (रिस्ट्रेनिंग) न्यायालयाचा आदेश मिळेल त्यावेळी त्यास

(एक) विनिमय क्र. २६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विमापत्र पुन्हा अभिहस्तांकित करता येणार नाही किंवा हवाली करता येणार नाही; किंवा

(दोन) विमापत्राची रक्कम घेता येणार नाही. परंतु हे प्रकरण तो तात्काळ मंडळाकडे पाठवील.

**नियम - २८ :**

**या विनियमांमध्ये कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, विनियम क्र. १७ चा खंड (क) किंवा १७ (१) किंवा विनियम क्र. १९ चा खंड (क) किंवा (ख) अन्वये निधीतून काढलेलली अनुक्रमे परतावायोग्य किंवा नापरतावा आगाऊ रक्कम, ही ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली होती त्यासाठी तिचा वापर न करता अन्य प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यात आला याबाबत ती मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, प्रस्तुत रक्कम विनियम क्र. १६ मध्ये तरतूद करण्यात आलेल्या दराने त्यावरील व्याजासह वर्गणीदार ताबडतोब निधीमध्ये भरील आणि तसे करण्यास त्याने कसूर केल्यास, तो रजेवर असला तरीही त्याच्या वित्तलब्धीतून ती एकरकमी वसूल करण्याचे आदेश देण्यात येतील. जर अशी एकूण रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीच्या निम्म्यापेक्षा अधिक असेल त्यावेळी वसूल करावयाच्या संपूर्ण रकमेची प्रकरणपरत्वे, परतफेड होईपर्यंत किंवा ती भरली जाईपर्यंत, त्याच्या वित्ततलब्धीचा निम्मा हिस्सा अशा मासिक हप्त्याने वसूल केली जावी.**

टीप : या विनयमात वापर करण्यात आलेल्या **"वित्तलब्धी"** या शब्दप्रयोगात निर्वाह अनुदानाचा समावेश नसेल.

**नियम - २८ (क) : भविष्यनिर्वाह निधीतून आगाऊ रक्कम मंजूर करणारे सक्षम अधिकारी.**

| **अधिकाऱ्याचे पदनाम** | **अधिकार मर्यादा** |
|---|---|
| **१. (i) लेखा अधिकारी (अंशदायी भविष्यनिर्वाह निधी शाखा)** | **X रु. ५०,०००/- पर्यंत** |
| **(ii) भविष्य निर्वाह निधीच्या विश्वस्त मंडळाचे सचीव आणि त्यांच्या अनुपस्थितीत अंशदायी भविष्य निर्वाह निधी शाखेचे लेखाधिकारी ज्यांच्याकडे उप मु. ले.अ. या पदाचा प्रभार आहे.** | **X रु. ५०,०००/- पेक्षा अधिक** |
| **२. अध्यक्ष, म. रा. वि. मंडळ :** | मंडळाच्या सेवेतील कोणत्याही कर्मचाऱ्याला निकडीच्या प्रसंगी आगाऊ रक्कम मंजूर करण्यासाठी या अधिकाराचा वापर करण्यात येईल. वरील १ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना प्रदान केलेल्या अधिकाराव्यतिरिक्त हा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. |

**नियम - २९ : संचित रकमा कोणत्या प्रसंगी देय होतील**

वर्गणीदार नोकरी सोडील त्यावेळी, विनियम क्र. ३२ अन्वये करावयाच्या कोणत्याही वजातीच्या अधीन, निधीतील त्याच्या खात्यावर जमा असलेलली रक्कम त्याला देय होईल.

परंतु, अंशदायी भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ किंवा तद्न्वये तयार केलेली योजना लागू असणाऱ्या कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत निधीतील रक्कम काढण्यासाठी तो ज्या तारखेला अर्ज करील त्या तारखेच्या लगत अगोदरच्या तारखेपूर्वी, सलग किमान XX (दोन) महिने तो नोकरीस नसला पाहिजे. XX(तथापी दोन महिन्याचा जरुरी असलेला प्रतिक्षाकाळ हा लग्न करण्यासाठी अस्थापनाच्या नोकरीचा राजीनामा देवून जाणाऱ्या महिला खातेदारांच्या बाबतीत लागू नसेल.)

टीप : सदस्याने, वरीलप्रमाणे नोकरीस नसल्याच्या पुष्ट्यर्थ असे लेखी निवेदन दिल्यास तो त्याबाबतचा पुरावा म्हणून स्वीकारण्यात यावा.

**नियम - ३० :**

**(१) वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली पूर्ण रक्कम खालील बाबतीत देय असेल :**

(क) मंडळाच्या सेवा विनियमांतील विनियम क्र. १७ यात तरतूद केल्याप्रमाणे सेवानिवृत्तीचे वय झाल्यानंतर वर्गणीदार निवृत्तिपूर्व रजेवर गेल्यास;

---

**X सुधारपत्र क्र. १२ दिनांक १८-९-१९९६ अन्वये सुधारित.**

**X X सुधारपत्र क्र. ९ दिनांक १८-११-१९९३ अन्वये सुधारित.**

केलेल्या प्रमाणात एक किंवा अनेक नामनिर्दिष्ट व्यक्तींना देय होईल.

**टीप १ :** भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९५२ चे कलम २ यातील खंड (ग) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, नामनिर्दिष्ट व्यक्ती वर्गणीदारावर अवलंबून असेल तेव्हा, अधिनियमाचे कलम ३, पोटकलम (२) अन्वये, अशी रक्कम त्या नामनिर्दिष्ट व्यक्तीमध्ये निहित असेल.

**टीप २ :** (क) जेव्हा वर्गणीदाराला कुटुंब नसेल; आणि

(ख) विनियम क्र. ८ मधील तरतुदींच्या अनुरोधाने त्याने करून दिलेले नामनिर्देशन अस्तित्वात नसेल; किंवा

(ग) असे नामनिर्देशन निधीतील त्याच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेच्या काही भागापुरते मर्यादित असेल तेव्हा-

वरील (क) व (ख) प्रकरणी पूर्ण रक्कम व (ग) प्रकरणी शिल्लक रक्कम, कायदेशीरपणे हक्कदार असलेल्या व्यक्तीला देय असेल.

(तीन) कोणत्याही सदस्याच्या मृत्यूनंतर निधीतील त्याच्या खात्यातील शिल्लक रकमेचे अंतिम प्रदान करण्यापूर्वी, त्याच्या संपदेवरील संपदा शुल्क (इस्टेट ड्युटी) देय असल्यास ते भरण्यात आलेले आहे किंवा ते भरण्याची समाधानकारक व्यवस्था करण्यात आली आहे याबद्दल विश्वस्त / सचिव खात्री करून घेईल.

(सूचना : या पोटनियमाच्या प्रयोजनास्तव, (दोन्ही हिस्से मिळून) भविष्यनिर्वाह निधीतील रु. ५,००० किंवा त्यापेक्षा अधिक जमा रक्कमच हिशेबात घेण्यात यावी.)

**नियम - ३२ (१) : वजाती**

या विनियमांमध्ये कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, ज्या प्रकरणी, गंभीर गैरवर्तणुकीचे कृत्य केल्यामुळे कर्मचाऱ्याला नोकरीतून काढून टाकण्यात आले असेल किंवा विनिर्दिष्ट करण्यात आलेला सेवेचा कालावधी संपण्यापूर्वी अनारोग्य किंवा अन्य टाळता न येण्यायोगे कारण याखेरीज इतर कोणत्याही कारणावरून त्याने स्वेच्छेने नोकरी सोडली असेल तर त्याचा अपवाद करता, निधीतून कोणतीही रक्कम वसूल करण्याचा मंडळास हक्क असणार नाही.

**वर्गणीदाराच्या निधीतील खात्यात जमा असलेल्या रकमेचे प्रदान केले जाण्यापूर्वी, मंडळाला त्यातून पुढीलप्रमाणे रकमा कापून घेण्याचे निदेश देता येतील.**

(क) X वगळण्यात आले.

(ख) X वगळण्यात आले.

(ग) X वगळण्यात आले.

X स्पष्टीकरण : वगळण्यात आले.

---

**X सुधारपत्र क्र. ९ दिनांक १८-११-१९९३ नुसार वगळण्यात आले.**

X विनियम क्र. ३२ ची टीप (१) वगळण्यात आले.

(२) या विनियमाच्या प्रयोजनास्तव, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीचे किंवा अधिनियमान्वये सूट देण्यात आलेल्या निधीचे, पूर्वी सदस्य असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेची गणना करण्यात येईल.

**नियम - ३३ :**

कराराच्या मुदतीत नियोक्त्याचे अंशदान देण्याचा संबंध असेल तेथवर, त्या अंशदानाची पूर्ण रक्कम देय असेल आणि कराराची मुदत संपल्यानंतर मंडळातील नियमित सेवेच्या कालावधीसाठी नियोक्त्याचे अंशदान देण्याचा संबंध असेल तेथवर, सेवेच्या एकूण कालावधीची गणना करताना (कराराच्या मुदतीसह) संपूर्ण कालावधी हिशेबात घेण्यात येईल.

**नियम - ३४ :**

(क) XX निधीत वर्गणीदाराच्या खाती जमा असलेला देय रक्कम देय होईल तेव्हां या विनिमयांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे ती तात्काळ चुकती करणे XXX (याचे विनामर्यादा अधिकार, भ. नि. नि. विश्वस्त मंडळाचे सचिव किंवा त्यांच्या अनुपस्थितीत भ. नि. निधीचे उपमुख्यलेखाधीकारी याचे कर्तव्य असेल.)

(एक) सचिव सदस्याचे खाते बंद करील व ज्या व्यक्तीला ती रक्कम देय असेल त्याला त्याबाबत लेखी नोटीस पाठवील आणि या नोटिशीत देय रक्कम व ती देण्याची तयारी या बाबींचा निर्देश असेल. या विनियमांच्या अनुसार ज्या प्रकरणी नामनिर्देशन केलेले नसेल त्याबाबतीत, जर निधीच्या खात्यातील रक्कम रु. ५०० (रुपये पाचशे फक्त) पेक्षा कमी असेल आणि चौकशीअंति ती रक्कम मिळणाऱ्या व्यक्तीच्या हक्काबाबत सचिवाची खात्री पटेल तर, त्या हक्कदार व्यक्तीला तो अशी रक्कम देऊ शकेल.

(दोन) देय होणाऱ्या रकमेच्या ज्या हिश्श्याबद्दल कोणताही वाद किंवा संशय असेल त्याबाबतीत, रकमेच्या ज्या हिश्श्याबाबत वाद किंवा संशय नसेल तेवढ्या हिश्श्याचे सचिव तात्काळ प्रदान करील आणि उरलेली रक्कम शक्य होईल तितक्या लवकर चुकती करील.

(तीन) या विनियमान्वये ज्या व्यक्तीला कोणतीही रक्कम द्यावयाची असेल ती व्यक्ती अज्ञान किंवा वेडी असेल व तिच्या संपदेची (इस्टेट) व्यवस्था पाहण्यासाठी, प्रकरणपरत्वे, "पालक व पाल्य अधिनियम, १८९० (१८९० चा आठवा)" अन्वये पालकाची किंवा "भारताचा वेडाबाबत अधिनियम, १९१२ (१९१२ चा चौथा)" अन्वये व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशा पालकाला किंवा व्यवस्थापकाला प्रदान दिले जावे. ज्या प्रकरणी असा पालक किंवा व्यवस्थापक नियुक्त करण्यात आला नसेल त्याबाबतीत, रु. ५०० पेक्षा अधिक रक्कम नसल्यास सचिव आणि रु. १००० पेक्षा अधिक रक्कम नसल्यास विश्वस्त मंडळ, ज्या व्यक्तीला अशा अज्ञान किंवा वेड्या व्यक्तीचा योग्य प्रतिनिधी आहे असे ठरवील त्या व्यक्तीला प्रदान देईल आणि त्या व्यक्तीने दिलेली रकमेची पावती म्हणजे ज्या रकमेचे प्रदान

---

**X सुधारपत्र क्र. ९ दि. १८-११-१९९३ अन्वये वगळले.**
**XX सुधारपत्र क्र. ९ दि. १८-११-१९९३ अन्वये बदल.**
**XXX सुधारपत्र क्र. ८ दि. ९-९-१९९३ नुसार समाविष्ट.**

रीतसर झाल्याचा पुरावा असेल. अन्य कोणत्याही प्रकरणी, अशा अज्ञान किंवा वेड्या व्यक्तीच्या वतीने रक्कम स्वीकारण्याची कायदेशीर अधिकारी असेल त्या व्यक्तीला असे प्रदान देण्यात येईल.

(चार) एखाद्या मृत सदस्याचे मूल जन्माला येणार आहे ही गोष्ट सचिवाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल त्याबाबबतीत ते मूल जिवंत जन्माला आल्यास त्याला देय असणारी रक्कम तो ठेऊन घेईल व उर्वरित रकमेचे वाटप करील. परंतु, असे मूल जन्माला आले नाही किंवा मृत जन्माला आले तर अशा ठेवून घेतलेल्या रकमेचे विनियम क्र. ३१ मधील तरतुदींनुसार वाटप करण्यात येईल.

(पाच) या नियमान्वये ज्या कोणत्या व्यक्तीला प्रदानाची मागणी करण्याची इच्छा असेल तिने, विहित केलेला नमुना ११ किंवा १२ यापैकी जो नमुना लागू होत असेल त्या नमुन्यात, सचिवाकडे तात्काळ लेखी अर्ज पाठवील व त्यानंतर ज्या व्यक्तीला असे प्रदान पाठवायचे असेल त्या व्यक्तीने, खाली दिलेल्या ज्या विकल्पाचा स्वीकार केला असेल त्याप्रमाणे सचिव ती रक्कम पाठवू शकेल;

(१) पैसे घेणाऱ्याच्या खर्चाने धनप्रेषाद्वारे (मनीऑर्डर)

(२) डाकेने पाठवलेल्या रेखित धनदेशाद्वारे (क्रॉस्ड चेक)

(३) असल्यास, पैसे घेणाऱ्याच्या डाक बचत बँक खात्यात रक्कम जमा करून.

(ख) काढलेल्या रकमांचे प्रदान केवळ भारतातच करण्यात येईल. ज्या व्यक्तींना रकमा देय असतील अशा व्यक्तींनी त्या रकमांचा भारतात स्वीकार करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**संचित शिल्लक रकमांवरील आयकर कापून घेणे**

परंतु, कर्मचाऱ्यांना देय होणाऱ्या संचित शिल्लक रकमांचे प्रदान करणारे निधीचे विश्वस्त किंवा निधीच्या विनियमांद्वारे अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्ती, ज्या प्रकरणांना आयकर अधिनियम, १९६१ ची चौथी अनुसूची - भाग- क यातील नियम ९ चा पोटनियम (एक) लागू असेल त्या प्रकरणी, कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या संचित शिल्लक रकमा प्रदान करताना, त्या नियमाप्रमाणे देय होणाऱ्या रकमा त्यातून कापून घेतील आणि या संचित शिल्लक रकमा जणू काही उक्त अधिनियमात व्याख्या केलेल्या "वेतन" या शीर्षाखालील आकारणीयोग्य "उत्पन्न" आहे असे मानून त्या अधिनियमातील प्रकरण सतरा-ख मधील सर्व तरतुदी अशा संचित शिल्लक रकमांना लागू होतील.

(ग) वर्गणीदाराच्या खात्यात जमा असलेली रक्कम विनियम क्र. २९, ३० किंवा ३१ अन्वये देय होईल तेव्हा, विनियम क्रर. ३४ (क) (पाच) अनुसार विहित केलेल्या नमुन्यांतील योग्यप्रकारे भरून पाठवलेला अर्ज मिळाल्यानंतर, सक्षम, अधिकारी, वर्गणीदाराला त्याच्या खाती जमा असलेली रक्कम तात्काल प्रदान करण्यात यावी, असा आदेश देईल.

परंतु, प्रकरणपरत्वे, वर्गणीदाराची किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीची कोणतीही चूक नसताना कोणतीही रक्कम त्याला दिली गेली नसेल. त्यावेळी, ही रक्कम देण्याचा आदेश ज्या महिन्यात देण्यात आला असेल त्या महिन्याच्या लगतपूर्वीच्या पूर्ण महिन्यासाठी, विनियम क्र. १६ मध्ये विहित केलेल्या

दराने त्या रकमेवर व्याज दिले जावे.

आणखी असे की, रक्कम मिळणाऱ्या व्यक्तीला तिची अदत्त (आऊटस्टँडिंग) रक्कम घेऊन जाण्यासाठी सक्षम अधिकारी जी तारीख कळवील त्या तारखेनंतरच्या कालावधीसाठी व्याज देण्यात येणार नाही.

**नियम - ३५ : कार्यपद्धती**

निधीचे विश्वस्त व मंडळ यांच्यात कामाची जी व्यवस्था करण्यात आली असेल तिच्या अधीन, या विनियमांन्वये मंडळाकडून विश्वस्तांना प्राप्त झालेल्या सर्व रकमा, त्या मिळाल्यापासून ३ दिवसांच्या आत स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडण्यात आलेल्या निधीच्या खात्यात जमा करण्यात येतील. तसेच निधीसंबंधातील सर्व प्रदाने विश्वस्त या खात्यातून करतील.

**नियम - ३६ :**

आपल्या वित्तलब्धीतून रक्कम कापून देऊन किंवा रोखीने वर्गणीचा भरणा करणारा वर्गणीदार ती निधीत भरतेवेळी, सचिवाने त्याला कळवलेला त्याचा खाते क्रमांक तो उद्धृत करील. तसेच त्या खाते क्रमांकात झालेला कोणताही बदल सचिव त्याला कळवील.

**नियम - ३७ : टाच आणण्याविरुद्ध संरक्षण**

(१) निधीच्या कोणत्याही सदस्याच्या खात्यात जमा असलेली रक्कम कोणत्याही स्थितीत अभिहस्तांकित किंवा भारित होण्याजोगी नसेल आणि सदस्याने कोणाही ऋणकोचे दायित्व पत्करले असले तरी, त्याच्या संबंधात न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याने (डिक्री) किंवा आदेशाने ती रक्कम टाच आणण्याजोगी नसेल. तसेच, इलाखाशहर दिवाळखोरी (प्रेसिडेंसी टाऊन इन्सॉल्व्हंसी) अधिनियम, १९०९ (१९०९ चा तिसरा) अन्वये नेमण्यात आलेल्या पदस्थ अभिहस्तांकितीला (ऑफिशियल असायनी) किंवा प्रांतीय दिवाळखोरी (प्रोव्हिंशिअल इन्सॉल्व्हंसी) अधिनियम, १९२० (१९२० चा पाचवा) अन्वये नेमण्यात आलेल्या प्रापकाला (रिसिव्हर) अशी कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असणार नाही किंवा त्या रकमेवर त्याला कोणताही दावा सांगता येणार नाही.

(२) एखाद्या सदस्याच्या मृत्यूसमयी निधीत त्याच्या खात्यात जमा असलेली व या विनियमान्वये त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीला देय असलेली कोणतीही रक्कम त्या नामनिर्दिष्ट व्यक्तीमध्ये निहित असेल आणि सदस्याच्या मृत्यूपूर्वी त्याने किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीने घेतलेले कोणतेही ऋण किंवा पत्करलेले कोणतेही दायित्व यापासून ती मुक्त असेल.

**नियम - ३८ :**

विश्वस्त, या विनियमातील तरतुदींच्या आधारे देय होतील अशा रकमा मिळण्यास हक्कदार असणाऱ्या व्यक्तींना, वेळोवेळी अशा रकमा देतील आणि गरज पडल्यास, निधीचे नुकसान होणार नाही अशारीतीने विश्वस्त, त्यांनी धारण केलेल्या रोख्यांची किंवा त्यापैकी काही रोख्यांची विक्री करून किंवा त्यांच्या तारणावर कर्ज घेऊन, त्यासाठी लागणारा पैसा उभा करतील.

**नियम - ३९ : बँकेचे खाते**

विश्वस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्यात ठरलेल्या कोणत्याही नित्य व्यवस्थेच्या अधीन राहून, निधीचा सर्व पैसा स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई येथे "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्ययनिर्वाह निधी लेखा" असे नामाभिधान असलेल्या खात्यात ठेवण्यात येईल. ज्या पैशाची निधीला तात्काळ गरज भासणार नसेल तो पैसा केंद्र सरकारचे मान्यताप्राप्त रोखे व केंद्र सरकारने उभारलेली कर्जे यात गुंतवण्यात येईल. कोणतेही रोखे परिणत (मॅच्युरिटी) झाल्यानंतर त्यांचे रूपांतरण किंवा पुनर्रूपांतरण करताना, ते केंद्र सरकारच्या रोख्यांमध्ये आणि / किंवा केंद्र सरकारने उभारलेल्या कर्जांमध्ये करण्यात येईल किंवा तो पैसा प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त वेळोवेळी ठरवील व कळवील त्याप्रमाणे गुंतवण्यात येईल.

**नियम - ४० :**

X (क) विनियम क्र. ३९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई, येथे निधीच्या नावे विश्वस्तांनी उघडलेले X (बचत) खाते त्याचप्रमाणे निधीच्या उचित प्रशासनासाठी, विश्वस्तांना आवश्यक वाटल्यास ते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये (किंवा तशीच परिस्थिती उद्भवल्यास कोणत्याही मान्य अनुसूचित बँकेमध्ये) त्यांनी निधीच्या नावे उघडलेल्या "सुरक्षितत ताबा" (सेफ कस्टडी) खात्याचा व्यवहार, विश्वस्त मंडळाचे कोणतेही दोन सदस्य संयुक्तपणे पाहू शकतील.

XX (ख) विनियम क्र. ३९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मुंबई येथे निधीच्या नावे विश्वस्ताती दुय्यम सर्वसाधारण खतावणी खाते उघडलेले असेल. रोख्याचे प्रत्यक्ष सादरीकरण टळावे व नियतकालीक व्याज जमा करण्यामधील विलंब टाळावा म्हणून केंद्र/ राज्य सरकारी रोखे ठेवण्याकरिता दुय्यम सर्वसाधारण खतावणी खात्याच्या रूपामध्ये असेल. सदरचे खाते विश्वस्त मंडळाचे कोणतेही दोन सदस्य संयुक्तपणे पाहू शकतील.

**नियम - ४१ :**

मंडळाची संमती व पूर्वमान्यता घेऊन विश्वस्तांना, कार्यपद्धती संबंधातील विनियम वेळोवेळी निरसित (रिपिल) करता येतील, त्यात फेरफार (व्हॅरी) किंवा फेरबदल (आल्टर) करता येईल आणि त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे निधीचे कामकाज व व्यवस्थापन या बाबींच्या संबंधात वेळोवेळी असे इतर नियम व विनियम तयार करता येतील. परंतु, स्वेच्छानिर्णयाच्या आधारे या विनियमांमध्ये केलेले कोणतेही फेरबदल किंवा त्यांमध्ये घातलेली कोणतीही भर किंवा त्यांत केलेले कोणतेही फेरफार कोणत्याही सदस्याच्या, असा फेरफार करतेवेळी किंवा भर घातलतेवेळी अस्तित्वात असलेल्या हितसंबंधांना बाधक ठरू नयेत.

आणखी असे की, आयकर आयुक्त किंवा प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त यांच्या पूर्वमंजुरीखेरीज भविष्यनिर्वाह निधीच्या संबंधातील विनियमांमध्ये कोणतीही भर घालण्यात येणार नाही किंवा त्यांमध्ये

---

**X सुधारपत्र क्र. ६ दि. २१-१०-१९९२ अन्वये बदल.**
**XX सुधारपत्र क्र. ६ दि. २१-१०-१९९२ नुसार समाविष्ठ**

फेरफार करण्यात येणार नाही.

तथापि, शासन, प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त आणि आयकर आयुक्त यांनी कोणत्याही सुधारणा सुचवल्यास त्या करण्यात याव्यात आणि त्या सुधारणांच्या प्रती (१ इंग्रजीत व १ प्रादेशिक भाषेत) सूचना फलकावर लावण्ययात याव्यात.

**नियम** - ४२ :

विश्वस्ताच्या किंवा विश्वस्तांच्या हाती जेवढा पैसा येईल त्यापेक्षा अधिक पैशासाठी किंवा रोख्यांच्या किंमती कमी झाल्यास त्यासाठी किंवा त्यांच्या किमतीत बदल झाल्यास त्यासाठी किंवा कोणत्याही बँकेकडून, कंपनीकडून किंवा व्यवसाय संस्थेकडून चूक घडली तर त्यासाठी किंवा ज्याच्याकडे विश्वस्तांच्या मालमत्तेचा कोणताही भाग सोपवण्यात आला आहे किंवा प्रभाराखाली ठेवण्यात आला आहे अशा कोणाही लिपिकाने किंवा सेवकाने अप्रामाणिकपणा दाखवल्यास त्यासाठी अशा विश्वस्तास किंवा विश्वस्तांना जबाबदार धरण्यात येणार नाही. मात्र त्याने किंवा त्यांनी स्वतः प्रत्यक्ष केलेल्या बुद्धिपुरस्सर कृतींसाठी, कृत्यांसाठी (डीडस) व कसुरीसाठी ते जबाबदार असतील, अन्य कोणत्याही गोष्टींसाठी तो / ते जबाबदार असणार नाही/ नाहीत.

**नियम - ४३ : विवाद**

कोणत्याही विनियमाच्या अर्थाबाबत किंवा त्याच्या प्रभावाबाबत किंवा त्या विनियमाशी संबंधित असलेल्या किंवा त्यामुळे उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबीमुळे कोणताही वर्गणीदार किंवा त्याचा मृत्युपत्रव्यवस्थापक (एक्झिक्युटर), प्रशासक (ॲडमिनिस्ट्रेटर), नामनिर्दिष्ट व्यक्ती किंवा प्रतिनिधी आणि विश्वस्त, किंवा कोणताही वर्गणीदार किंवा त्याचा मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, नामनिर्दिष्ट व्यक्ती किंवा प्रतिनिधी आणि मंडळ यांच्यात विवाद किंवा मतभेद निर्माण झाल्यास, ते प्रकरण प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताकडे पाठवण्यात येईल आणि त्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व सर्व संबंधित व्यक्तींवर बंधनकारक असेल.

तथापि, आयकर अधिनियम, १९६१ व तद्न्वये केलेले नियम यातील आवश्यकतांशी संबंधित असा कोणताही निर्णय विश्वस्त देतील किंवा मंडळ किंवा प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त देईल तेव्हा तो निर्णय संबंधित आयकर आयुक्तास कळवण्यात येईल.

**नियम** - ४४ :

कोणत्याही विश्वस्ताच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्याने केलेल्या लबाडीमुळे (फ्रॉड) एखादी मागणी उद्‌भवली नसेल तेव्हा, त्यावेळी त्याला कराव्या लागणाऱ्या प्रत्येक कार्यवाहीसंबंधातील परिव्यय खर्चाची पूर्ती निधीकडून करून घेण्यास तो हक्कदार असेल.

**नियम - ४५ : निधीबाबतचा खर्च**

निधीचे लेखे ठेवणे, लेखे व विवरणे सादर करणे, संचित रकमांचे हस्तांतरण करणे, तपासणी फी देणे, विश्वस्तमंडळाच्या बैठकींना उपस्थित राहण्याबद्दल विश्वस्तांना प्रवास खर्च देणे, इत्यादी कामांसह निधीच्या प्रशासनाच्या संबंधात येणारा सर्व खर्च मंडळ करील.

**नियम - ४६ : निधी बंद करणे**

निधी बंद करण्यात आल्यास किंवा त्याचा कारभार गुंडाळण्यात आल्यास, त्यातील रकमेबाबत सर्व लाभाधिकाऱ्यांच्या संमतीने आणि प्रदेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त निदेश देईल त्या रीतीने कार्यवाही करण्यात येईल.

तथापि, निधी बंद केल्यानंतर करण्यात येणारी कोणतीही व्यवस्था संबंधित आयकर आयुक्ताच्या पूर्वमान्यतेच्या अधीन असेल आणि या नियमान्वये दिलेल्या कोणत्याही प्रदानासंबंधात येणे असलेली कराची रक्कम विश्वस्त कापून घेतील.

**नियम - ४७ :**

हे विनियम अंमलात येण्यापूर्वी अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम, (मुंबई) किंवा सौराष्ट्र , मध्य प्रदेश, मुंबई आणि / किंवा कच्छ व मराठवाडा यांची संबंधित शासने यांच्या कोणत्याही भविष्यनिर्वाह निधीयोजना आणि / किंवा मुंबई राज्य विद्युत मंडळ कर्मचारी अंशदायी भविष्यनिर्वाह निधी विनियम या अन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती नियमानुसार केलेली कृती मानण्यात येईल व या विनियमांन्वये ती अमान्य करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे, निधीच्या प्रशासनाचे मंडळाकडे हस्तांतरण झाल्यानंतर मध्यंतरीच्या काळात मंडळ व मुंबई राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचे विश्वस्त यांनी केलेली कोणतीही कार्यवाही नियमनुसार केलेली कार्यवाही मानण्यात येईल.

**नियम - ४८ :**

या विनियमांतील कोणतीही तरतूद व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या भविष्यनिर्वाह निधीसंबंधातील कोणत्याही कायद्यातील कोणतीही अनिवार्य (मॅंडटरी) तरतूद यामध्ये संघर्ष उद्‌भवल्यास, ही अनिवार्य तरतूद लागू असल्याचे मानण्यात येईल.

**नियम - ४९ : नियम व विनियम करण्याचे अधिकार**

विहित कार्यपद्धतीचे अनुपालन केल्यानंतर आणि विनियम क्र. ४१ यात निर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधाना अधीन राहून, मंडळाला आवश्यक वाटेल त्यावेळी हे विनियम निरसित करणे, त्यात फेरफार करणे, फेरबदल करणे किंवा त्यात कोणतीही भर टाकणे यासंबंधातील अधिकार मंडळ स्वतःकडे राखून ठेवीत आहे.

**नमुना क्र. १**

**कुटुंब असणाऱ्या वर्गणीदारांसाठी**

**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्यनिर्वाह निधी**

**(विनियम क्र. ८)**

**नामनिर्देशनाचा नमुना**

मी, ——————————, ———(पदनाम)————, अंशदायी भविष्ययनिर्वाह निधी खाते क्र. ———————, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्यनिर्वाह निधी विनियमांतील विनियम क्र. २ मधील व्याख्येनुसार माझ्या कुटुंबाचे सदस्य असलेल्या खालील व्यक्तींना, निधीतील माझ्या खात्यावर जमा असलेली रक्कम प्रदानयोग्य होण्याआधी किंवा प्रदानयोग झाल्यानंतरहि प्रदान करण्यात आलेली नसल्यास त्यापूर्वी मी मरण पावल्यास, स्वीकारण्यासाठी याद्वारे नामनिर्देशित करीत आहे व असा निदेश करीत आहे की ती रक्कम खाली नमूद केलेल्या रीतीने त्या व्यक्तींमध्ये विभागून देण्यात यावी:

| नामनिर्देशित व्यक्तीचे संपूर्ण नाव आणि पत्ता | वर्गणी दाराशी नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | नामनिर्देशित व्यक्ती एक-पेक्षा अधिक असल्यास संचित रकमेचा प्रत्येकीस द्यावयाचा हिस्सा X | नामनिर्देशन विधि-अग्राह्य ठरू शकेल अशी आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती वर्गणी-दारापूर्वी मृत्यू पावल्यास तिचे हक्क ज्या व्यक्तीकडे जावेत त्या व्यक्तीचे नाव, पत्ता व तिचे वर्गणीदाराशी नाते XX |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

**टीप : X** १) नामनिर्देशित व्यक्ती एकापेक्षा अधिक असल्यास, वर्गणीदाराच्या खात्यावर कोणत्याही वेळी जमा असलेली रक्कम त्यांच्यात पूर्णपणे वाटली जाईल, अशा रीतीने या स्तंभात माहिती भरावी.

**X** २) नामनिर्देशित व्यक्ती अज्ञान असेल आणि वर्गणीदाराखेरीज अन्य व्यक्ती तिचा पालक असेल तर त्या व्यक्तीचे पूर्ण नाव आणि पत्ता या स्तंभात भरावा.

ठिकाण :

दिनांक :

(वर्गणीदाराची सही)

खालील दोन व्यक्तींच्या समक्ष
वर्गणीदाराने सही केली :

| **नाव** | **सही** | |
|---|---|---|
| १) - - - - - - - - - - - - - - - - - | - - - - - | तपासून स्वीकारले |
| २) - - - - - - - - - - - - - - - - - | - - - - - | सचिव, विश्वस्त मंडळ (अंशदायी भविष्यनिर्वाह निधी) |

## नमुना क्र. २
## कुटुंब नसणाऱ्या वर्गणीदारांसाठी
## महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्यनिर्वाह निधी
## (विनियम क्र. ८)
## नामनिर्देशनाचा नमुना

मी, ————————, ————(पदनाम)————, अंशदायी भविष्ययनिर्वाह निधी खाते क्र. ————————, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंशदायी भविष्यनिर्वाह निधी विनियमांतील विनियम क्र. २ मधील व्याख्येनुसार माझ्या कुटुंब नसलेल्या खालील व्यक्तींना, निधीतील माझ्या खात्यावर जमा असलेली रक्कम प्रदानयोग्य होण्याआधी किंवा प्रदानयोग झाल्यानंतर प्रदान करण्यात आलेली नसल्यास त्यापूर्वी मी मरण पावल्यास, स्वीकारण्यासाठी याद्वारे नामनिर्देशित करीत आहे व असा निदेश करीत आहे की ती रक्कम खाली नमूद केलेल्या रीतीने त्या व्यक्तींमध्ये विभागून देण्यात यावीः

| नामनिर्देशित व्यक्तीचे संपूर्ण नाव आणि पत्ता | वर्गणी दाराशी नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | नामनिर्देशित व्यक्ती एक-पेक्षा अधिक असल्यास संचित रकमेपैकी प्रत्येकीस द्यावयाचा हिस्सा X | नामनिर्देशन विधि-अग्राह्य ठरू शकेल अशी आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती वर्गणी-दारापूर्वी मृत्यू पावल्यास तिचे हक्क ज्या व्यक्तीकडे जावेत त्या व्यक्तीचे नाव, पत्ता व तिचे वर्गणीदाराशी नाते XX |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

१. अनिवार्य : यानंतर मी कुटुंबात झाल्यास हे नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल.

२. वर्गणीदारास अन्य कोमतीही गोष्ट नमूद करावयाची असल्यास ती खाली नमूद करावी.

टीप : X १) नामनिर्देशित व्यक्ती एकापेक्षा अधिक असल्यास, वर्गणीदाराच्या खात्यावर कोणत्याही वेळी जमा असलेली रक्कम त्यांच्यात पूर्णपणे वाटली जाईल, अशा रीतीने या स्तंभात माहिती भरावी.

